श्री.

शिवस्वरोदय.

ह्याचें संस्कृत मूळपुस्तक
शुद्ध करून,

वे० शा० सं० वामन एकनाथ शास्त्री
केमकर ह्यांजकडून करविलेल्या
मराठी भाषांतरासहित,

हा ग्रंथ,

पुणें, पेठ शनिवार, मेहुणपुरा येथें रावजी श्रीधर गोंध-
ळेकर याणीं आपले "जगद्धितेच्छु" छापखा-
न्यांत छापिला.

किमत ०१० आणे; ट० ख० ०२ दोन आणे.

ता० १९ माहे मार्च सन १८८९ ई०.

आवृत्ति ३ री.



प्रस्तावना.

शिवस्वरोदय शास्त्र हें योगशास्त्राचें अंग होय. यांतील विषय ज्योतिषशास्त्राप्रमाणें सर्वोपयोगी असून त्याचा प्रचार नसल्यामुळें त्यापासून होणारा लाभ न होतां त्याचें नांवही बहुतेकांस विदित नाहींसें झालें आहे. याचें कारण, हा ग्रंथ संस्कृत भाषेंत असून यांत सांगितलेल्या प्रकरणांस मुख्य आधार स्वराचा आहे. म्हणून स्वरज्ञान नसल्यामुळें संस्कृतज्ञांची आणि भाषाज्ञानाच्या अभावामुळें इतरांची या विषयांत प्रवृत्ति होत नाहीं असें जाणून ती अडचण दूर होण्यासाठीं सदरील ग्रंथाचें मराठी भाषांतर करून तें मूलासहित छापलें आहे. आतां स्वरज्ञानाचें रहस्य गुरुमुखावांचून स्पष्ट समजणार नाहीं हें खरें आहे, तथापि स्वरसंबंधीं कांहीं उपयुक्त माहिती भाषांतरांत दिली आहे. तीवरून साधारण स्वरज्ञान होईल.

यांत स्वर, तत्त्वें, युद्ध, ध्यान, वशीकरण, गर्भाधान, संवत्सरफल, रोग आणि मरण याविषयींचा निर्णय केला आहे. कोणते स्वरावर कोणतीं कृत्यें केलीं असतां सिद्धि होते, व कोणत्या कार्यास कोणता स्वर वर्ज्य, हा विचार थोडक्यांत असून अनुभवशीर सांगितलेला आहे. याकरितां या ग्रंथास सर्व लोक आपला उदार आश्रय देऊन आमच्या श्रमाचें साफल्य करतील अशी आशा आहे. या ग्रंथाचा खप बरासा झाल्यास आणखी कांहीं स्वरोदय आहेत त्यांचेंही भाषांतर करण्यास आह्मांस उमेद येईल.

रावजी श्रीधर गोंधळेकर.

अनुक्रमणिका.

इति शिवस्वरोदयस्यानुक्रमणिका.

श्री ।

श्रीगणेशाय नमः ।

अथ

शिवस्वरोदयः प्रारभ्यते।

महेश्वरंनमस्कृत्यशैलजांगणनायकम् ॥
गुरुंचपरमात्मानंभजेसंसारतारणम् ॥ १ ॥

अर्थ–शंकर, पार्वती आणि गणपति यांस नमस्कार करून संसारसमुद्रतारक जो सद्गुरु व परमात्मा यांस मी भजतों.

देव्युवाच ॥ देवदेवमहादेवकृपांकृत्वाममोपरि ॥
सर्वसिद्धिकरंज्ञानंकथयस्वममप्रभो ॥ २ ॥

अर्थ–देवी (पार्वती) शंकरास ह्मणते.–हे देवाधिदेवा शंकरा, मजवर कृपा करून सर्व कार्यांची सिद्धि करणारें ज्ञान मला सांगा.

कथंब्रह्मांडमुत्पन्नंकथंवापरिवर्त्तते ॥
कथंविलीयतेदेववदब्रह्मांडनिर्णयम् ॥ ३ ॥

अर्थ–हे देवा, हें ब्रह्मांड कसें उत्पन्न झालें, याची स्थिति (पोषण) कशानें होतें, आणि याचा लय कसा होतो, हा ब्रह्मांडाविषयींचा निर्णय मला सांगा.

ईश्वरउवाच ॥ तत्त्वाद्ब्रह्मांडमुत्पन्नंतत्त्वेनपरिवर्तते ॥
तत्त्वेविलीयतेदेवितत्त्वाद्ब्रह्मांडनिर्णयः ॥ ४ ॥

अर्थ–शंकर ह्मणतात, हे देवि, तत्त्वापासून ब्रह्मांड उत्पन्न होतें, तत्त्वावरच याची स्थिति आहे, आणि तत्त्वाचे ठिकाणींच याचा लय होतो, या ब्रह्मांडाचा निर्णयही तत्त्वापासूनच समजतो.

देव्युवाच ॥ तत्त्वमेवपरंमूलंनिश्चितंतत्त्ववादिभिः ॥
तत्त्वस्वरूपंकिंदेवतत्त्वमेवप्रकाशय ॥ ५ ॥

अर्थ—देवी ह्मणते, तत्त्वच ब्रह्मांडाचें मूळ आहे असा तत्त्ववादी निश्चय करतात, परंतु तत्त्व कोणतें, त्याचें स्वरूप काय? हें मला स्पष्ट कळेल असें आपण मला सांगावें.

ईश्वरउवाच ॥ निरंजनोनिराकारएकोदेवोमहेश्वरः ॥
तस्मादाकाशमुत्पन्नमाकाशाद्वायुसंभवः ॥ ६ ॥

अर्थ—मायारहित, निराकार, स्वयंप्रकाश, एक, सर्वांतर्यामी जो परमात्मा त्यापासून आकाश उत्पन्न झालें. आकाशापासून वायु उत्पन्न झाला.

वायोस्तेजस्ततश्चापस्ततःपृथ्वीसमुद्भवः ॥
एतानिपंचतत्त्वानिविस्तीर्णानिचपंचधा ॥ ७ ॥

अर्थ—वायूपासून तेज, तेजापासून उदक आणि उदकापासून पृथ्वी याप्रमाणें उत्पन्न झालेलीं हीं पांच तत्त्वें प्रत्येक पांच पांच प्रकारांनीं विस्तार पावलीं आहेत.

तेभ्योब्रह्मांडमुत्पन्नंतैरेवपरिवर्त्तते ॥ विलीयते
चतत्रैव तत्रैवरमतेपुनः ॥ ८ ॥

अर्थ—त्या तत्त्वांपासून हें ब्रह्मांड उत्पन्न झालें, त्याच्याच योगानें याची स्थिति होते, आणि हें त्या तत्त्वांतच शेवटीं लीन होऊन राहतें.

पंचतत्त्वमयेदेहेपंचतत्त्वानिसुंदरि ॥ सूक्ष्मरूपेण
वर्त्ततेज्ञायंतेतत्त्वयोगिभिः ॥ ९ ॥

अर्थ—हे सुंदरि, या पंचतत्त्वांपासून उत्पन्न झालेल्या देहांत पांच तत्त्वें सूक्ष्मरूपानें आहेत त्यांस योगी जाणतात.

अथस्वरंप्रवक्ष्यामिशरीरस्थस्वरोदयम् ॥ हंसचा-
रस्वरूपेणभवेज्ज्ञानंत्रिकालजम् ॥१०॥

अर्थ—आतां अकारादिस्वरांच्या उच्चारास मूलकारण जो शरीरस्थ स्वर त्याविषयीं सांगतों; जें स्वरज्ञान झालें असतां हंसचार (श्वास बाहेर येतांना व आंत जातांना क्रमानें हं आणि स असा उच्चार होतो तो) याच्या स्वरूपावरून योगी जनांस भूत, भविष्य आणि वर्त्तमान या त्रिकालांचें ज्ञान होतें.

गुह्याद्गुह्यतरंसारमुपकारप्रकाशनम् ॥ इदंस्व-
रोदयंज्ञानंज्ञानानांमस्तकेमणिः ॥ ११ ॥

अर्थ—अत्यंत गोप्य, सर्वोपकारक आणि सारभूत हें स्वरोदयाचें ज्ञान सर्व ज्ञानांत केवळ शिरोमणि होय.

सूक्ष्मात्सूक्ष्मतरंज्ञानंसुबोधंसत्यप्रत्ययम् ॥
आश्चर्यंनास्तिकेलोकेआधारंत्वास्तिकेजने ॥१२॥

अर्थ—हें स्वरज्ञान अत्यंत सूक्ष्म असून अत्यंत सुबोध आणि सत्यत्वानें प्रतीतीस येणारें आहे. नास्तिक लोकांनाही आश्चर्य करणारें, हें ज्ञान आस्तिकजनांस मोठा आधारच होय

अथशिष्यलक्षणं.

शांतेशुद्धेसदाचारेगुरुभक्त्यैकमानसे ॥ दृढचित्ते-
कृतज्ञेचदेयंचैवस्वरोदयम् ॥ १३ ॥

अर्थ—शांत, शुद्ध, आचारसंपन्न, गुरुभक्तिविषयीं तत्पर, दृढमनाचा आणि कृतज्ञ (उपकाराचें स्मरण ठेवणारा) अशा शिष्यास ह्या स्वरज्ञानाचा उपदेश करावा.

दुष्टेचदुर्जनेक्रुद्धेनास्तिकेगुरुतल्पगे ॥ हीनसत्वेदुरा-
चारेस्वरज्ञानंनदीयते ॥ १४ ॥

अर्थ–दुष्ट, दुर्जन, क्रोधी, अविश्वासी, गुरुस्त्रीशीं गमन करणारा, धैर्यहीन व दुराचारी, अशा शिष्यास स्वरज्ञान देऊं नये.

शृणुत्वंकथितंदेविदेहस्थंज्ञानमुत्तमम् ॥ येनवि-
ज्ञातमात्रेणसर्वज्ञत्वंप्रणीयते ॥ १५ ॥

अर्थ–हे देवि, आपले शरीरांत असलेल्या स्वराविषयीं ज्ञान मी सांगतों तें तूं ऐक, या स्वरज्ञानाच्या योगानें सर्व ज्ञान प्राप्त होतें.

स्वरेवेदाश्चशास्त्राणिस्वरेगांधर्वमुत्तमम् ॥ स्वरे
चसर्वंत्रैलोक्यंस्वरमात्रस्वरूपकम् ॥ १६ ॥

अर्थ–सर्व वेद, शास्त्रें आणि गायन, हीं स्वराच्या आश्रयानेंच आहेत, किंबहुना सर्व त्रैलोक्य स्वराचे ठिकाणीं आहे. व स्वर हें सर्व जगाचें स्वरूप होय.

स्वरहीनश्चदैवज्ञोनाथहीनंयथागृहम् ॥ शास्त्र-
हीनंयथावक्त्रंशिरोहीनंचयद्वपुः ॥ १७ ॥

अर्थ–स्वामीवांचून जसें घर, शास्त्र संस्कारावांचून जसें मुख, अथवा शिरावांचून जसें शरीर, त्याप्रमाणें स्वरज्ञानाशिवाय ज्योतिषी शोभत नाहीं.

नाडीभेदंतथाप्राण-तत्त्वभेदंतथैवच ॥ सुषुम्ना-
मिश्रभेदंचयोजानातिसमुक्तिगः ॥ १८ ॥

अर्थ–सर्व नाडींचा भेद, प्राणतत्त्वांतील भेद व सुषुम्नादि जें नाडीत्रय त्यांतील भेद जो जाणतो तो मुक्तीस जातो.

साकारेवानिराकारेशुभंवायुबलंकृते ॥ कथयं-
तिशुभंकेचित्स्वरज्ञान वरानने ॥ १९ ॥

अर्थ–स्वरज्ञात्यांमध्यें कोणी ह्मणतात कीं, साकार (व्यावहारिक)

आणि निराकार (पारमार्थिक) कर्मास शुभवायूचें बळ प्रशस्त होय कोणी पारमार्थिक कृत्यास वायुबळाची गरज नाहीं ह्मणतात.

ब्रह्मांडखंडपिंडाद्याःस्वरेणैवहिनिर्मिताः ॥ सृष्टि-
संहारकर्त्ताचस्वरःसाक्षान्महेश्वरः ॥ २० ॥

अर्थ–सर्व ब्रह्मांड व पिंड हे स्वरापासूनच निर्माण झाले; जगाची सृष्टि व संहारकर्त्ता जो ईश्वर तोही स्वररूपच आहे.

स्वरज्ञानात्परंगुह्यंस्वरज्ञानात्परंधनम् ॥ स्वरज्ञा-
नात्परंज्ञानंनवादृष्टंनवाश्रुतम् ॥ २१ ॥

अर्थ–स्वरज्ञानासारखें दुसरें गुह्य कांहीं नाहीं; स्वरज्ञान हेंच मुख्य धन होय; स्वरज्ञानापेक्षां श्रेष्ठ ज्ञान तर कोठें पाहण्यांत नाहीं व ऐकण्यांतही नाहीं.

शत्रुंहन्यात्स्वरबलेतथामित्रसमागमः ॥ लक्ष्मी-
प्राप्तिः स्वरबलेकीर्तिःस्वरबलेसुखम् ॥ २२ ॥

अर्थ–स्वरज्ञानाच्या बळानें शत्रुनाश, मित्रसमागम, लक्ष्मीप्राप्ति, कीर्ति आणि सुख हीं फळें प्राप्त होतात.

कन्याप्राप्तिःस्वरबलेस्वरतोराजदर्शनम् ॥ स्वरेण
देवतासिद्धिः स्वरेणक्षितिपोवशः ॥ २३ ॥

अर्थ–स्वरबलानें कन्यापुत्रादि संतति प्राप्त होते, स्वरानें राजदर्शन होतें, स्वरानें देवतासिद्धि होते, आणि स्वरज्ञानानें राजा वश होतो.

स्वरेणगम्यतेदेशोभोज्यंस्वरबलेतथा ॥ लघुदीर्घं
स्वरबलेमलंचैवनिवारयेत् ॥ २४ ॥

अर्थ–स्वरबलावर देशाटन करावें, स्वरबलानें भोजन करावें, स्वराचे बळानें लघुशंका व मलत्याग करावा.

सर्वशास्त्रपुराणादिस्मृतिवेदांगपूर्वकम् ॥ स्वरज्ञा-
नात्परंतत्त्वंनास्तिकिंचिद्वरानने ॥ २५ ॥

अर्थ—हे सुंदरी, सर्व शास्त्रें, पुराणें, स्मृति आणि वेदांगें यांत स्वर ज्ञानाहून श्रेष्ठ तत्त्व कांहीं एक नाहीं.

नामरूपादिकःसर्वोमिथ्यासर्वेषुविभ्रमः ॥ अज्ञान-
मोहितामूढायावत्तत्त्वंनविद्यते ॥ २६ ॥

अर्थ——सर्व पदार्थमात्राचेठिकाणीं नामरूपादिक हा केवळ भ्रम होय; जोंपर्यंत स्वररूपतत्त्वाचें ज्ञान नाहीं, तोंपर्यंत हे जीव अज्ञानानें मोहित झालेले ह्मणून मूढ होत.

इदंस्वरोदयंशास्त्रंसर्वशास्त्रोत्तमोत्तमम् ॥ आत्मघ-
टप्रकाशार्थंप्रदीपकलिकोपमम् ॥ २७ ॥

अर्थ—हें स्वरोदयशास्त्र सर्व शास्त्रांत उत्तमोत्तम होय. आत्मा (पंचकोशात्मक जीव) हाच कोणीएक कुंभ, यांत प्रकाश करणारें हें स्वरशास्त्र केवळ महादीपाच्या ज्वाळेप्रमाणें होय.

यस्मैकस्मैपरस्मैवानप्रोक्तंप्रश्नहेतवे ॥ तस्मादेत-
त्स्वयंज्ञेयमात्मनोवाऽत्मनाऽत्मनि ॥ २८ ॥

अर्थ—हें स्वरोदयशास्त्र केवळ कोणी दुसरे प्रश्न करतील, त्याकरतांच सांगतलें आहे असें नाहीं, तर हें आपलें आपण आपले ठिकाणींच जाणावें.

नतिथिर्नचनक्षत्रंनवारोग्रहदेवताः ॥ नचविष्टिर्व्य-
तीपातोवैधृत्याद्यास्तथैवच ॥ २९ ॥

अर्थ—या स्वरोदय शास्त्रांत विशेष तिथि, नक्षत्र, वार, ग्रह आणि देवता हें कांहीं नाहीं, यांत भद्रा, व्यतीपात वैधृति इत्यादि कुयोगांचा दोष नाहीं.

कुयोगोनास्तिकोदेविभवितावाकदाचन ॥ प्राप्तेस्व-
रबलेशुद्धेसर्वमेवशुभंफलम् ॥ ३० ॥

अर्थ—हे पार्वती, या स्वरशास्त्रांत कोणताही कुयोग मुळींच नाहीं, व पुढेंही उत्पन्न होणार नाहीं, स्वराचें बळ निर्मळतेनें प्राप्त झालें असतां सर्व शुभ फलच प्राप्त होतें.

देहमध्येस्थितानाड्योबहुरूपाःसुविस्तरात् ॥ ज्ञा-
तव्याश्चबुधैर्नित्यंस्वदेहज्ञानहेतवः ॥ ३१ ॥

अर्थ—देहामध्यें अनेक रूपानें ज्या नाडी आहेत, त्या सुज्ञ पुरुषांनीं आधीं सविस्तर जाणाव्या, ह्मणजे शारीरज्ञान होण्यास तें नाडीज्ञान कारण होतें.

नाभिस्थानगकंदोर्ध्वमंकुरादेवनिर्गताः ॥ द्विस-
प्ततिसहस्राणिदेहमध्येव्यवस्थिताः ॥ ३२ ॥

अर्थ—नाभिस्थानीं असलेल्या कंदापासून निघालेला जो अंकुर त्यांतून बहात्तर हजार नाड्या निर्माण झाल्या त्या सर्व शरीरांत आहेत.

नाडीस्थाकुंडलीशक्तिर्भुजंगाकारशायिनी ॥ ततोद-
शोर्ध्वगानाड्योदशैवाधःप्रतिष्ठिताः ॥ ३३ ॥

अर्थ—या नाडींत भुजंगाप्रमाणें शयन करणारी एक कुंडली नामक शक्ति आहे, तिच्यावर दहा नाड्या आहेत, आणि खालीं दहा नाड्या आहेत.

द्वेद्वेतिर्यग्गतेनाड्यौचतुर्विंशतिसंख्यया ॥ प्रधाना
दशनाड्यस्तुदशवायुप्रवाहकाः ॥ ३४ ॥

अर्थ—दोन बाजूंस दोन दोन मिळून चार बाकड्या गेलेल्या नाड्या आहेत. या व पहिल्या २० मिळून २४ त्यांत दहा वायूंस वाहणाऱ्या ज्या १० नाड्या त्या मुख्य होत.

तिर्यगूर्ध्वास्तथाऽधःस्थावायुदेहसमन्विताः ॥ चक्रव-
तूसंस्थितादेहेसर्वाःप्राणसमाश्रिताः ॥ ३५ ॥

अर्थ—वाकड्या, वर गेलेल्या व खालीं असलेल्या सर्व नाड्या वायुसहित देहांत चक्राप्रमाणें राहिल्या आहेत, आणि त्या सर्वांस प्राणाचा आश्रय आहे,

तासांमध्येदशश्रेष्ठादशानांतिस्रउत्तमाः ॥ इडा
चपिंगलाचैवसुषुम्नाचतृतीयका ॥ ३६ ॥

अर्थ—त्या सर्व नाड्यांत दहा श्रेष्ठ होत.त्या दहांतही इडा,पिंगला, आणि सुषुम्ना या तीन मुख्य होत.

गांधारीहस्तिजिव्हाचपूषाचैवयशस्विनी ॥ अलं-
बुषाकुहूश्चैवशंखिनीदशमीतथा ॥ ३७ ॥

अर्थ—चौथी गांधारी, पांचवी हस्तिजिव्हा, सहावी पूषा, सातवी यशस्विनी, आठवी अलंबुषा, नववी कुहू, आणि दहावी शंखिनी, याप्रमाणें दहा नाडी जाणाव्या.

इडावामेस्थिताभागेपिंगलादक्षिणेस्मृता ॥
सुषुम्नामध्यदेशेतुगांधारीवामचक्षुषि ॥ ३८ ॥

अर्थ—इडा वामभागीं आहे, पिंगला दक्षिणभागीं आहे, सुषुम्ना मध्यप्रदेशीं आणि गांधारी वामनेत्राचे ठिकाणीं आहे.

दक्षिणेहस्तिजिव्हाचपूषाकर्णेचदक्षिणे ॥
यशस्विनीवामकर्णेआननेचाप्यलंबुषा ॥ ३९ ॥

अर्थ—हस्तिजिव्हा उजव्या नेत्राचे ठिकाणीं, पूषा उजव्या कानांत, यशस्विनी वामकर्णांत, आणि अलंबुषा मुखाचे ठायीं वास करते.

कुहूश्चलिंगदेशेतुमूलस्थानेतुशंखिनी ॥

एवंद्वारंसमाश्रित्यतिष्ठंतिदशनाडिकाः ॥ ४० ॥

अर्थ–कुहू लिंगाचेठायीं, व शंखिनी मूलस्थानीं (गुदस्थानीं) वास्तव्य करते, याप्रमाणें दहा नाड्या शरीरद्वारांचा आश्रय करून राहतात.

इडापिंगलासुषुम्नाचप्राणमार्गेसमाश्रिताः ॥
एताहिदशनाड्यस्तुदेहमध्येऽव्यवस्थिताः ॥ ४१ ॥

अर्थ–इडा, पिंगला आणि सुषुम्ना, या तीन नाड्या प्राणमार्गाचा आश्रय करून राहतात, याप्रमाणें दहा नाड्या शरीरांतील मुख्य होत.

नामानिनाडिकानांतुवातानांतुवदाम्यहम् ॥
प्राणोऽपानःसमानश्चउदानोव्यानएवच ॥ ४२ ॥

अर्थ–आतां नाड्यांस आश्रयभूत जे शरीरस्थवायु त्यांचीं नांवें सांगतों. प्राण, अपान, व्यान, उदान व समान हे पांच वायु मुख्य होत.

नागः कूर्मोऽथकृकलोदेवदत्तोधनंजयः ॥ हृदिप्राणोवसेन्नित्य-मपानोगुदमंडले ॥ ४३ ॥

अर्थ–नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि धनंजय हे पांच उपप्राण होत. आतां या दहा वायूंचीं स्थानें सांगतों.–प्राण नेहमीं हृदयाचे ठिकाणीं राहतो, आणि अपान गुदस्थानीं राहतो.

समानोनाभिदेशेतुउदानःकंठमध्यगः ॥ व्यानोव्यापीशरीरेषुप्रधानादशवायवः ॥ ४४ ॥ प्राणाद्याः पंचविख्याता नागाद्याःपंचवायवः ॥ तेषामपिचपंचानांस्थानानिचवदाम्यहम् ॥ ४५ ॥

अर्थ–समान वायु नाभिस्थानीं, उदान कंठमध्याचे ठिकाणीं आणि व्यान सर्व शरिराचेठायीं रहातो, याप्रमाणें हे दहा वायु मुख्य होत.

अर्थ--प्राणादिक पांच वायूंचीं स्थानें सांगितलीं. आतां नागादिक पांच वायूंचीं स्थानें सांगतों.

उद्गारेनागआख्यातः कूर्मउन्मीलनेस्मृतः ॥कृक-
लःक्षुतकृज्ज्ञेयोदेवदत्तोविजृंभणे ॥ ४६ ॥

अर्थ--नागवायु ढेंकर आणणारा होय, कूर्म नेत्रोन्मीलन कर्ता, कृकल हा शिंक आणणारा, आणि देवदत्त हा जांभई देणारा होय. हे वायु स्वस्थानीं राहून आपापले व्यापार करतात.

नजहातिमृतंवापिसर्वव्यापीधनंजयः ॥ एतेनाडी-
षुसर्वासुभ्रमंतेजीवरूपिणः ॥ ४७ ॥

अर्थ--धनंजय नांवाचा वायू मात्र सर्व शरीरभर व्याप्त असून तो मरणानंतरही शरीरास सोडीत नाहीं. याप्रमाणें हे वायु जीवरूपानें सर्व नाड्यांत भ्रमण करतात.

प्रकटंप्राणसंचारंलक्षयेद्देहमध्यतः ॥ इडापिं-
गलासुषुम्नाभिर्नाडीभिस्तिसृभिर्बुधः ॥ ४८ ॥

अर्थ--बुद्धिमान् पुरुषानें देहाचे आंत प्राण संचार होतो तो इडा, पिंगला व सुषुम्ना या तीन नाड्यांवरून जाणावा.

इडावामेचविज्ञेयापिंगलादक्षिणेस्मृता ॥ इडानाडी
स्थितावामाततोव्यस्ताचपिंगला ॥ ४९ ॥

अर्थ--इडानाडी वामभागीं आहे व पिंगला दक्षिणभागीं आहे; ह्मणून सामान्यतः ज्या डाव्या नाड्या त्या साऱ्या इडा, आणि उजव्या पिंगला जाणाव्या.

इडायांतुस्थितश्चंद्रःपिंगलायांचभास्करः ॥ सुषुम्ना
शंभुरूपेणशंभुर्हंसस्वरूपतः ॥ ५० ॥

अर्थ—इडानाडीचे ठिकाणीं चंद्र आहे, पिंगलेच्या ठिकाणीं सूर्य आहे आणि सुषुम्नेच्या ठिकाणीं हं आणि स अशा मिश्ररूपानें साक्षात् शंभु वास्तव्य करतो.

हकारोनिर्गमेप्रोक्तःसकारेणप्रवेशनम् ॥ हकारःशिवरूपेणसकारःशक्तिरुच्यते ॥ ५१ ॥

अर्थ—स्वर निघतांना हकाराचें उच्चारण होतें आणि पुनः आंत जातांना सकारपूर्वक जातो; त्यांत हकार हें शिवाचें रूप, आणि सकार हें शक्तिरूप जाणावें.

शक्तिरूपस्थितश्चंद्रोवामनाडीप्रवाहकः ॥ दक्षनाडीप्रवाहश्चशंभुरूपोदिवाकरः ॥ ५२ ॥

अर्थ—वामनाडीस वाहविणारा चंद्र शक्तिरूपी होय, दक्षिणनाडीचा प्रवाहक जो सूर्य तो शंभुरूपी होय.

श्वासेसकारसंस्थेतुयद्दानंदीयतेबुधैः ॥ तद्दानंजीवलोकेऽस्मिन्कोटिकोटिगुणंभवेत् ॥ ५३ ॥

अर्थ—श्वास सकाराचे ठिकाणीं असतां जें दान द्यावें तें या लोकांत कोटिगुण फलप्रद होतें.

अनेनलक्षयेद्योगीचैकचित्तःसमाहितः ॥ सर्वमेव विजानीयान्मार्गेवैचंद्रसूर्ययोः ॥ ५४ ॥

अर्थ—या क्रमानें योगीपुरुषानें निश्चळ चित्त करून चंद्रसूर्यनाडींच्या मार्गावरूनच सर्व जाणावें.

ध्यायेत्तत्त्वंस्थिरेजीवेअस्थिरेनकदाचन ॥ इष्टसिद्धिर्भवेत्तस्यमहालाभोजयस्तथा ॥ ५५ ॥

अर्थ—जीव स्थिर असतां तत्त्वचिंतन करावें, जेव्हां चित्त

अस्वस्थ असतें तेव्हां करूं नये. जो स्थिरमनानें तत्त्व शोधन करतो त्यास इष्टसिद्धि, महालाभ आणि जय हीं प्राप्त होतात.

चंद्रसूर्यसमभ्यासंयेकुर्वंतिसदानराः ॥ अतीतानागतज्ञानंतेषांहस्तगतंभवेत् ॥ ५६ ॥

अर्थ–जे पुरुष चंद्र आणि सूर्य यांचा चांगल्या प्रकारें अभ्यास करतात त्यांस भूतभविष्य ज्ञान हस्तगत होतें.

वामेचामृतरूपास्याज्जगदाप्यायनंपरम् ॥ दक्षिणे चरभागेनजगदुत्पादयेत्सदा ॥ ५७ ॥

अर्थ–वामभागीं जी नाडी (इडा) ती अमृतरूपानें सर्व जगास आप्यायन ह्मणजे पुष्टि करणारी होय, दक्षिणेस जी पिंगला नाडी ती चरभागेंकरून सर्व जगास उत्पन्न करते.

मध्यमाभवतिक्रूरादुष्टासर्वत्रकर्मसु ॥ सर्वत्रशुभकार्येषुवामाभवतिसिद्धिदा ॥ ५८ ॥

अर्थ---मधली जी सुषुम्नानाडी ती सर्व कर्मांविषयीं निंद्य आणि क्रूर होय, आणि वामनाडी सर्व शुभकार्यांत सिद्धिप्रद होय.

निर्गमेतुशुभावामाप्रवेशेदक्षिणाशुभा ॥ चंद्रः समस्तुविज्ञेयोरविस्तुविषमः सदा ॥ ५९ ॥

अर्थ–घरांतून बाहेर निघतांना वामनाडी शुभ होय, प्रवेशकालीं दक्षिणनाडी प्रशस्त होय. चंद्र सम आणि रवि विषम होय.

चंद्रःस्त्रीपुरुषःसूर्यश्चंद्रोगौरोऽसितोरविः॥चंद्रनाडीप्रवाहेणसौम्यकार्याणिकारयेत् ॥ ६० ॥

अर्थ–चंद्र स्त्री आणि सूर्य पुरुष, चंद्र गौरवर्ण व सूर्य नीलवर्ण होय, याकरितां सर्व सौम्य कार्यें चंद्रस्वरावर करावीं.

सूर्यनाडीप्रवाहेणरौद्रकर्माणिकारयेत् ॥ सुषु-
म्नायाःप्रवाहेणभक्तिमुक्तिफलानिच ॥ ६१ ॥

अर्थ—सूर्यनाडी प्रवाहानें उग्र कर्मे करावीं. आणि सुषुम्नेच्या प्रवाहानें भक्तिमुक्तिफलदायक कर्मे करावीं.

आदौचंद्रःसितेपक्षेभास्करोहिसितेतरे ॥ प्र-
तिपत्तोदिनान्याहुस्त्रीणित्रीणिकृतोदयौ ॥ ६२ ॥

अर्थ—शुक्लपक्षीं आधीं चंद्र आणि कृष्णपक्षीं आधीं सूर्य अशा क्रमानें प्रतिपदेपासून तीन तीन दिवस चंद्र व सूर्य या स्वरांचे उदय वलिष्ट होत.

सार्धद्विघटिकेज्ञेयःशुक्लेकृष्णेशशीरविः ॥वहत्येक-
दिनेनैवयथाषष्टिघटीःक्रमात् ॥ ६३ ॥

अर्थ—चंद्र व सूर्य हे स्वर क्रमानें शुक्ल व कृष्ण या पक्षीं प्रत्येक २॥ अडीच घटका वाहतात. याप्रमाणें २४ आवृत्ति एक अहोरात्रींत (६० घटिकांत) होतात.

वहेयुस्तद्धटीमध्येपंचतत्त्वानिनिर्दिशेत् ॥ प्रति-
पत्तोदिनान्याहुर्विपरीतेविवर्जयेत् ॥ ६४ ॥

अर्थ—त्या प्रत्येक आवृत्तींतील २॥ घटिकांत पंचतत्त्वें वाहतात. ज्या प्रतिपदेस आधीं चंद्राचा उदय सांगितला आहे, तेव्हां सूर्योदय किंवा सूर्याचे वेळेस चंद्र असें वैपरीत्य झाल्यास अशुभ होय.

शुक्लपक्षेभवेद्वामाकृष्णपक्षेचदक्षिणा ॥ जानी-
यात्प्रतिपत्पूर्वंयोगीतद्यतमानसः ॥ ६५ ॥

अर्थ—शुक्लपक्षीं प्रतिपदेस पूर्वी चंद्र व कृष्णपक्षीं आधीं सूर्य शुभ होय. यासाठीं योगी पुरुषानें एकाग्र अंतःकरणेंकरून चंद्रसूर्याचे स्वर जाणावे

शशांकंवारयेद्रात्रौदिवावारयभास्करं ॥ इत्य-
भ्यासरतोनित्यंसयोगीनात्रसंशयः ॥ ६६ ॥

अर्थ—रात्रीं चंद्रस्वर चालवूं नये, आणि सूर्यस्वर दिवसां निवारण करावा. अशा क्रमानें अभ्यासांत जो निमग्न असतो तोच योगी होय.

सूर्येणबध्यतेसूर्यश्चंद्रश्चंद्रेणबध्यते ॥ योजा-
नातिक्रियामेतांत्रैलोक्यंवशगंक्षणात् ॥ ६७ ॥

अर्थ—सूर्यानें सूर्य बंद होतो आणि चंद्रानें चंद्र प्रतिबद्ध होतो. जर चंद्र बंद करावयाचा असेल तर डाव्या कुशीवर निजावें, किंवा डावे काखेंत कुबडी दाबून धरावी; याप्रमाणेंच सूर्य स्वर बंद करतांना उजवेकडे कुबडी धरावी, व उजवे कुशीवर निजावें. या क्रियेस जो जाणतो त्यास त्रैलोक्यही क्षणांत वश होतें.

उदयंचंद्रमार्गेणसूर्येणास्तमनंयदि ॥ तदातेगु-
णसंघाताविपरीतंविवर्जयेत् ॥ ६८ ॥

अर्थ---चंद्र तिथीस चंद्र मार्गानें उदय आणि सूर्य नाडीच्या मार्गानें अस्त जेव्हां होतो तेव्हां अनेक गुण उत्पन्न होतात, आणि जेव्हां याचे उलट होतें तेव्हां अनेक दोष होतात. याकरितां तें शुभकार्यास वर्ज होय.

गुरुशुक्रबुधें*दूनांवासरेवामनाडिका ॥ सिद्धि-
दासर्वकार्येषुशुक्लपक्षेविशेषतः ॥ ६९ ॥

अर्थ—गुरु, शुक्र, बुध आणि चंद्र या वारीं, त्यांत शुक्लपक्षीं विशेषें-करून वामनाडी सर्व कृत्यास सिद्धिदायक होय.

अर्कांगारकसौरीणांवासरेदक्षनाडिका ॥ स्म-

* कोणी बुधवारीं सुषुम्नानाडी प्रशस्त असें ह्मणतात.

त्तंव्याचरकार्येषुकृष्णपक्षेविशेषतः ॥ ७० ॥

अर्थ—रवि, मंगळ आणि शनि यांच्या वारीं दक्षिणनाडी चरकार्यास अत्युत्तम, त्यांत कृष्णपक्षीं विशेष फलदायक होय.

प्रथमंवहतेवायुःद्वितीयंचतथानलः ॥ तृतीयं वहतेभूमिश्चतुर्थेवारुणीवहेत् ॥ ७१ ॥

अर्थ—पहिल्यानें वायुतत्त्व वाहतें, दुसऱ्यानें अग्नितत्त्व, तिसरें भूमितत्त्व, चौथें वारुणतत्त्व, पांचवें आकाश, मिळून पांच तत्त्वें दर २॥ घटिकेंत पृथक् पृथक् क्रमानें उदय पावतात.

सार्धद्विघटिकेपंचक्रमेणैवोदयंतिच ॥ क्रमादेकैकनाड्यांचतत्त्वानांपृथगुद्भवः ॥ ७२ ॥

अर्थ—प्रत्येक अडीच घटिकांत पांच तत्त्वें उदय पावतात; याप्रमाणें इडा व पिंगला यांत पांच तत्त्वांचा उदय होतो.

अहोरात्रस्यमध्येतुज्ञेयाद्वादशसंक्रमाः ॥ वृषकर्कटकन्यालिमृगमीनानिशाकरे ॥ ७३ ॥

अर्थ—दिवसाच्या व रात्रीच्या मिळून ६० घटिका, त्यांत चंद्र सूर्याचीं बारा बारा संक्रमणें होतात तीं बारा लग्नें होत. त्यांमध्यें वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर आणि मीन हीं लग्नें चंद्राचीं होत.

मेषसिंहौचकुंभश्चतुलाचमिथुनंधनम् ॥ उदये दक्षिणेज्ञेयःशुभाशुभविनिर्णयः ॥ ७४ ॥

अर्थ—मेष, सिंह, कुंभ, तूळ, मिथून आणि धन हीं सूर्यलग्नें जाणावीं. यावरून शुभाशुभांचा निर्णय करावा.

तिष्ठेत्पूर्वोत्तरेचंद्रोभानुःपश्चिमदक्षिणे ॥ दक्षनाड्याःप्रसारेतुनगच्छेद्याम्यपश्चिमे ॥ ७५ ॥

अर्थ–चंद्र हा पूर्व आणि उत्तर या दिशांचेठायीं राहतो, पश्चिम व दक्षिण या ठिकाणीं राहतो. यासाठीं दक्षिणनाडींतून वाहत असतां दक्षिण व पश्चिम या दिशांस जाऊं नये.

वामाचारप्रवाहेतुनगच्छेत्पूर्वउत्तरे ॥ परिपंथि-
भयंतस्यगतोऽसौननिवर्त्तते ॥ ७६ ॥

अर्थ–वामनाडींचा प्रवाह चालू असतां पूर्व व उत्तर या दिशांस जाऊं नये, जर कोणी जाईल तर त्यास शत्रूचें भय उत्पन्न होईल, व तो गेलेला पुनः परत येणार नाहीं.

तत्रतस्मान्नगंतव्यंबुधैःसर्वहितैषिभिः ॥ त-
दातत्रतुसंयातेमृत्युरेवनसंशयः ॥ ७७ ॥

अर्थ–तस्मात् हिताची इच्छा करणारांनीं वर सांगितलेल्या निषिद्ध दिशेस जाऊं नये. ज्या स्वरास जी निषिद्ध दिशा सांगितली आहे, त्या दिशेस जाणारास मृत्यु होतो असें समजावें.

शुक्लपक्षेद्वितीयायामर्केवहतिचंद्रमाः ॥ दृश्य-
तेलाभदःपुंसांसौम्येसौख्यंप्रजायते ॥ ७८ ॥

अर्थ–शुक्लपक्षीं द्वितियेस सूर्य वाहत असून चंद्रदर्शन झालें असतां लाभदायक व सौम्य कृत्यांत सुखप्रद होय.

सूर्योदयेयदासूर्यश्चंद्रश्चंद्रोदयेभवेत् ॥ सि-
ध्यंतिसर्वकार्याणिदिवारात्रिगतान्यपि ॥ ७९ ॥

अर्थ–ज्या दिवशीं सूर्य--स्वराचा उदय सांगितला आहे, त्या दिवशीं सूर्यस्वर आणि चंद्रोदयाच्या दिवशीं चंद्रस्वर वाहत असतां सर्व कार्यें सिद्ध होतात. मग तीं कार्यें दिवसाचीं असोत किंवा रात्रीचीं असोत.

चंद्रकालेयदासूर्यःसूर्यश्चंद्रोदयेभवेत् ॥ उद्वे-
गःकलहोहानिः शुभंसर्वंनिवारयेत् ॥ ८० ॥

अर्थ—चंद्रस्वराचे वेळीं सूर्यस्वर व सूर्यस्वराच्या वेळीं चंद्रस्वर चालू झाला असतां उद्वेग (भय,) कलह, हानि व शुभकृत्याचें निवारंण हीं होतात.

सूर्यस्यवाहेप्रवदंतिविज्ञाज्ञानंह्यगम्यंस्यतु
निश्चयेन ॥ श्वासेनयुक्तस्यतुशीतरश्मेः प्रवा-
हकालेफलमन्यथास्यात् ॥ ८१ ॥

अर्थ—सूर्यस्वराचा प्रवाह असतां अगम्य (अतर्क्य) अर्थाचेंही निश्चयानें ज्ञान होतें, आणि श्वासांत चंद्रस्वर असून त्याच्या प्रवाहांत अन्यथाफळ होतें ह्मणजे अगम्य अर्थाचें ज्ञान होणार नाहीं.

अथविपरीतलक्षणम्.

यदाप्रत्यूषकालेनविपरीतोदयोभवेत् ॥ चंद्र-
स्थानेवहत्यर्कोरविस्थानेचचंद्रमाः ॥ ८२ ॥ प्रथ-
मेमनउद्वेगंधनहानिर्द्वितीयके ॥ तृतीयेगमनं
प्रोक्तंइष्टनाशंचतुर्थके ॥ ८३ ॥ पंचमेराजवि-
ध्वंसंषष्ठेसर्वार्थनाशनम् ॥ सप्तमेव्याधिदुःखा-
निअष्टमेमृत्युमादिशेत् ॥ ८४ ॥

अर्थ—प्रभातकालीं स्वरांचा उदय जर विपरीत होईल तर (चंद्राच्या जागीं सूर्य व सूर्याचे जागीं चंद्र असे स्वर झाल्यास) त्याचें कालपरत्वें फल सांगतों.--पहिल्या दिवशीं विपरीत स्वर वाहत असल्यास मनांत उद्वेग होतो. दुसऱ्यांत धनहानि, तिसऱ्यांत गमन, चौथ्यांत इष्टनाश, पांचव्यांत राजविध्वंस, साहव्यांत सर्वार्थनाश, सातव्यांत व्याधिदुःखें (रोग) आणि आठव्यांत मृत्यु होतो असें जाणावें.

कालत्रयेदिनान्यष्टौविपरीतंयदावहेत् ॥ तदा
दुष्टफलंप्रोक्तंकिंचिन्न्यूनंतुशोभनम् ॥ ८५ ॥

अर्थ–प्रातर्मध्यान्ह व सायंकाल या कालत्रयाचेठायीं सांगितलेले स्वर आठ दिवसांतही विपरीत वाहत असल्यास दुष्ट फल जाणावें. कांहीं न्यून असतां शुभफल जाणावें.

प्रातर्मध्यान्हयोश्चंद्रःसायंकालेदिवाकरः ॥
तदानित्यंजयोलाभोविपरीतंविवर्जयेत् ॥ ८६ ॥

अर्थ–प्रातःकालीं व मध्यान्हकालीं चंद्र व सायंकालीं सूर्य असेल तेव्हां जय व लाभ होतात. विपरीत झाले तर अशुभ जाणावें.

वामेवादक्षिणेवापियत्रसंक्रमतेशिवः ॥ कृत्वा
तत्पादमादौचयात्राभवतिसिद्धिदा ॥ ८७ ॥

अर्थ–वामभागीं किंवा दक्षिणभागीं जिकडे स्वर वाहत असेल तो पाय प्रथम पुढें करून प्रयाण केलें असतां सिद्धिदायक होतें.

चंद्रःसमपदःकार्योरविस्तुविषमःसदाः ॥ पूर्ण-
पादंपुरस्कृत्ययात्राभवतिसिद्धिदा ॥ ८८ ॥

अर्थ–चंद्रस्वर चालू असतां प्रथम समपाउलें २, ४, ६ अशीं, आणि सूर्यस्वर चालू असतां विषम ह्मणजे ३, ५, ७ अशीं पाउलें टाकावीं; पूर्णपाद पुढें करून प्रयाण करावें ह्मणजे सिद्धि होते.

यत्रांगेवहतेवायुस्तदंगकरसत्तलात् ॥ सुप्तो-
त्थितोमुखंस्पृष्ट्वालभतेवांछितंफलम् ॥ ८९ ॥

अर्थ–ज्या भागीं वायु वाहतो त्या आंगच्या तळहातानें निजून उठतांच मुखास स्पर्श करावा ह्मणजे इच्छित फल प्राप्त होतें.

परदत्तेतथाग्राह्येगृहान्निर्गमनेऽपिच ॥ यदंगे

वहतेनाडीग्राह्यंतेनकरांघ्रिणा ॥ ९० ॥

अर्थ–दुसन्यास कांहीं देतांना किंवा दुसन्यापासून घेतांना आणि घरांतून बाहेर जातांना जी नाडी वाहत असेल त्या आंगचे हात पाय प्रथम पुढें करावे. आणि तें काम करावें ह्मणजे तें कार्य उत्तम होतें.

नहानिःकलहोनैवकंटकैर्नापिभिद्यते ॥ निवर्त्त-
तेसुखीचैवसर्वोपद्रववर्जितः ॥ ९१ ॥.

अर्थ–त्या कृत्यांत कांहीं हानि व कलह होत नाहीं. शत्रूंकडून त्याचा नाश होत नाहीं. आणि निरुपद्रवीपणानें घरास सुखेंकरून परत येतो.

गुरुबंधुनृपामात्येष्वन्येषुशुभदायिनी ॥ पूर्णां-
गेखलुकर्त्तव्याकार्यसिद्धिर्मनःस्थिता ॥ ९२ ॥

अर्थ–गुरू, बंधु, राजा, प्रधान, इत्यादिकांपासून कार्य कर्त्तव्य असतां पूर्णांगानें त्या कृत्यास आरंभ करावा, म्हणजे मनाप्रमाणें कार्य सिद्धि होते.

अग्निचोराधर्मधर्माअन्येषांवादिनिग्रहाः ॥ क-
र्त्तव्याःखलुरिक्तायांजयलाभसुखार्थिभिः ॥ ९३ ॥

अर्थ–अग्निदाह, चोरास देणें, अधर्मकृत्य आणि वादिनिग्रह हीं कार्यें रिक्त नाडीवर करावीं. म्हणजे कर्त्यास जय, लाभ, व सुख हीं प्राप्त होतात.

दूरदेशेविधातव्यंगमनंतुहिमद्युतौ ॥ अभ्यर्ण-
देशेदीप्तेतुतरणावितिकेचन ॥ ९४ ॥

अर्थ–कित्येक लोकांचें मत असें आहे कीं, दूरदेशीं गमन कर्त्तव्य

असतां चंद्र स्वरावर जावें आणि समीप देशांत जावयाचें असल्यास सूर्य स्वरावर गमन करावें.

यत्किंचित्पूर्वमुद्दिष्टंलाभादिसमरागमः ॥ त-
त्सर्वंपूर्णनाडीषुजायतेनिर्विकल्पकम् ॥ ९५ ॥
शून्यनाड्याविपर्यस्तंयत्पूर्वंप्रतिपादितं ॥ जाय-
तेनान्यथाचैवयथासर्वज्ञभाषितम् ॥ ९६ ॥

अर्थ—जें पूर्वीं सांगितलें तें व लाभाचें कृत्य आणि युद्ध हीं कृत्यें पूर्णस्वरावर करावीं, म्हणजे परिपूर्ण होतात, आणि हीं कृत्यें शून्य नाडीवर केलीं असतां पूण होत नाहींत; असें सर्वज्ञ जो शंकर त्याचें वचन आहे.

व्यवहारेखलोच्चाटेद्वेषिविद्यादिवंचके ॥ कुपि-
तस्वामिचोराद्येपूर्णस्थाः स्युर्भयंकराः ॥ ९७ ॥

अर्थ—व्यापार, खलांचें उच्चाटन, द्वेष करणारे लोकांची वंचना, रागावलेल्या स्वामीचें दर्शन, चोरांची गांठ, या प्रसंगीं पूर्ण नाड्या भयंकर होत. याकरितां आपली रिक्तनाडी वर लिहिलेल्यांकडे करून उभें राहवें.

दूराध्वनिशुभश्चंद्रोनिर्विघ्नोऽभीष्टसिद्धिदः ॥ प्रवेश-
कार्यहेतौचसूर्यनाडीप्रशस्यते ॥ ९८ ॥

अर्थ—दूरमार्गास जातांना चंद्रस्वर निर्विघ्नतेनें इष्टसिद्धि करणारा होय. आणि प्रवेश कार्यास सूर्यनाडी प्रशस्त होय.

अयोग्येयोग्यतानाड्यायोग्यस्थानेऽप्ययोग्यता ॥
कार्यानुबंधनोजीवोयथारुद्रस्तथाचरेत् ॥ ९९ ॥

अर्थ—नाडीच्या योगानें अयोग्यास योग्यता प्राप्त होते, आणि योग्य प्राणी अयोग्यतेस प्राप्त होतो; याकरितां जीवानें आपल्या का-

यांस योग्य अशा नाडीचा उपयोग करावा, व जसा वायु असेल तसें वागावें.

चंद्रचारेविषहतेसूर्योबलिवशंनयेत् ॥ सुषुम्नायांभवेन्मोक्षएकोदेवस्त्रिधास्थितः ॥ १०० ॥

अर्थ--चंद्रस्वर चालू असतां इतरांनीं केलेले अपकार सहन करतो, सूर्यस्वरांत बलवानासही वश करतो. सुषुम्नानाडी चालू असतां मोक्ष होतो. याप्रमाणें एक देव तीन प्रकारांनीं राहिला आहे,

शुभान्यशुभकार्याणिक्रियंतेऽहर्निशंयदा ॥ तदाकार्यानुरोधेनकार्यंनाडीप्रचालनम् ॥ १०१ ॥

अर्थ—शुभ किंवा अशुभ कार्यें रात्रीं व दिवसां जीं कर्त्तव्य असतील त्या कार्यानुरूप नाडीचें चलन करावें,

अथ इडा.

स्थिरकर्मण्यलंकारेदूराध्वगमनेतथा ॥ आश्रमेधर्मप्रासादेवस्तूनांसंग्रहेऽपिच ॥ १०२ ॥

अर्थ—स्थिरकर्म, अलंकार, दूरदेशगमन, आश्रम,धर्म, गृह व वस्तु संग्रह या कृत्यांस इडा ह्मणजे चंद्रनाडी प्रशस्त होय,

वापीकूपतडागादिप्रतिष्ठास्तंभदेवयोः ॥ यात्रादानेविवाहेचवस्त्रालंकारभूषणे ॥ १०३ ॥

अर्थ—विहीर, आड, व तळीं बांधणें, स्तंभ व देव यांची प्रतिष्ठा, यात्रा, दान व लग्न वस्त्र आणि अलंकार-धारण या कृत्यांस चंद्र (वाम) नाडी प्रशस्त होय.

शांतिकेपौष्टिकेचैव दिव्यौषधिरसायने ॥ स्वस्वामिदर्शनेमित्रेवाणिज्येकणसंग्रहे ॥ १०४ ॥

अर्थ—शांतिकर्म, पौष्टिक, दिव्य औषधि, रसायनें, स्वकीयजन व स्वामी यांचें दर्शन, मित्रसंग्रह, व्यापार व धान्यसंग्रह हीं कृत्यें इडानाडी (चंद्र) चालू असतां शुभ होत.

ग्रहप्रवेशेसेवायांकृषौचबीजवापने ॥ शुभकर्मणि संधौचनिर्गमेचशुभः शशी ॥ १०५ ॥

अर्थ—गृहप्रवेश, सेवा, कृषी, बीज पेरणें, संधि (तह करणें) निर्गम आणि इतर शुभ कर्मे यांस चंद्रनाडी शुभ होय.

विद्यारंभादिकार्येषुबांधवानांचदर्शने ॥ जन्ममोक्षे चधर्मेचदीक्षायांमंत्रसाधने ॥ १०६ ॥ कालविज्ञानसूत्रेतुचतुष्पादगृहागमे ॥ कालव्याधिचिकित्सायांस्वामिसंबोधनेतथा ॥ १०७ ॥

अर्थ—विद्यारंभ, बंधुदर्शन, जन्म, (उपनयन) मोक्ष, धर्म, दीक्षा, मंत्रसिद्धि, कालविज्ञान, व सूत्र यांचें अध्ययन, चतुष्पाद घरास आणणें, काल व व्याधीची चिकित्सा करणें, व स्वामीस बोलावणें, या कृत्यांस चंद्रनाडी शुभ होय.

गजाश्वारोहणेधन्विगजाश्वानांचबंधने ॥ परोपकरणेचैवनिधीनांस्थापनेतथा ॥ १०८ ॥ गीतवाद्यादिनृत्यादौनृत्यशास्त्रविचारणे ॥ पुरग्रामनिवेशेचातिलकक्षेत्रधारणे ॥ १०९ ॥

अर्थ—नूतन हत्ती व घोडा यांवर आरोहण, गजाश्वांचें बंधन, परोपकार, निधिस्थापन, गायन, वाद्य व नृत्य यांस आरंभ, गीत, शास्त्रविचार, शहर किंवा ग्राम यांत प्रवेश, तिलकधारण, आणि क्षेत्र (शेत) ग्रहण या कृत्यांस चंद्र (इडा) नाडी शुभ होय.

आर्तिशोकविषादेचज्वरितेमूर्च्छितेऽपिवा ॥ स्वज-

नस्वामिसंबंधेअन्नादेर्दारुसंग्रहे ॥ ११० ॥

अर्थ–दुःख*, शोक, विषाद, ज्वर, मूर्छा, स्वजन व स्वामी यांचा संबंध, आणि अन्नादिक व काष्ठें यांचा संग्रह, या कृत्यांस चंद्रनाडी प्रशस्त होय.

स्त्रीणांदंतादिभूषायांवृष्टेरागमनंतथा ॥ गुरुपूजाविषादीनांचालनेचवरानने ॥ १११ ॥ इडायांसिद्धिदं प्रोक्तंयोगाभ्यासादिकर्मच ॥ तत्रापिवर्जयेद्वायुंतेज आकाशमेवच ॥ ११२ ॥

अर्थ–स्त्रियांचीं दंतादि भूषणें (बांगड्या फणी वगैरे) वृष्टीचा आरंभ, गुरुपूजा, विषादिकांचें चालन (बाहेर पाडणें) आणि योगाभ्यासादि कर्मे हीं सर्व कृत्यें इडा (वाम) नाडीवर केलीं असता, सिद्धीस जातात; परंतु त्या नाडींत वायु, तेज, आणि आकाश हीं तत्त्वें वर्ज होत.

सर्वकार्याणिसिद्ध्यंतिदिवारात्रिगतान्यपि ॥ सर्वेषुशुभकार्येषुचंद्रचारःप्रशस्यते ॥ ११३ ॥

अर्थ–हीं वर सांगितलेलीं कृत्यें दिवसां किंवा रात्रीं केलीं तरी सिद्ध होतात. एवं च सर्व शुभ कृत्यांत चंद्रनाडी प्रशस्त होय.

अथ पिंगला.

कठिनक्रूरविद्यानांपठनेपाठनेतथा ॥ स्त्रीसंगवेश्यागमनेमहानौकाधिरोहणे ॥ ११४ ॥ भ्रष्टकार्येसुरापानेवीरमंत्राद्युपासने ॥ विव्हलोत्ध्वंसदेशादौविषदानेचवैरिणां ॥ ११५ ॥ शास्त्राभ्या-

*दुःख शोकादिक चंद्रनाडीवर प्राप्त झाले असतां लौकर नाहींसे होतात.

सेवगमनेमृगयापशुविक्रये ॥ इष्टिकाकाष्ठपा-
षाणरत्नघर्षणदारुणे ॥ ११६ ॥

अर्थ---कठिण व क्रूर अशा विद्यांचें पठन किंवा अध्यापन, स्त्रीसंग, वेश्यागमन, महानौकेंत आरोहण, दुष्टकृत्य, सुरापान, वीरमंत्रादिकांची उपासना, विव्हलता, देशविध्वंस, वैऱ्यास विष देणें, शास्त्राभ्यास, गमन, मृगया, जनावरांचें युद्ध, इष्टिका (विटा), पाषाण, काष्ठ, रत्न, यांचें घर्षण आणि इतर दारुण कृत्यें यांस पिंगला (सूर्य) नाडी प्रशस्त होय.

गत्यभ्यासेयंत्रतंत्रेदुर्गपर्वतरोहणे ॥ द्यूतेचौर्येंग-
जाश्वादिरथसाधनवाहने ॥ ११७ ॥ व्यायामेमार-
णोच्चाटेषट्कर्मादिकसाधने ॥ यक्षिणीयक्षवेता-
लविषभूतादिनिग्रहे ११८ ॥ खरोष्ट्रमहिषादीनां
गजाश्वारोहणेतथा ॥ नदीजलौघतरणेभेषजेलि-
पिलेखने ॥ ११९ ॥

अर्थ—द्यूतक्रीडा, अश्व, गज, रथ इत्यादि वाहनांची सिद्धता अथवा त्यांवर आरोहण करणें, चौर्यगतीचा अभ्यास, यंत्र, तंत्र, किल्ला, व पर्वत, यांवर चढणें, व्यायाम, मारण, उच्चाटन, षट्कर्में, यक्षिणी, यक्ष, वेताल, विष आणि पिशाच, यांचें निवारण, गर्दभ, उंट, महिष, गज, व अश्व, इत्यादिकांवर आरोहण, नदीच्या उदकांतून पार जाणें, तीव्र औषधें व लिपींचें लेखन या सर्व कृत्यांस दक्षिणनाडी प्रशस्त होय.

मारणेमोहनेस्तंभेविद्वेषोच्चाटनेवशे ॥ प्रेरणेकर्ष-
णेक्षोभेदानेचक्रयविक्रये ॥ १२० ॥ प्रेताकर्षण-
विद्वेषशत्रुनिग्रहणेऽपिच ॥ खड्गहस्तेवैरियुद्धेभो-

गेवाराजदर्शने ॥ भोज्येस्नानेव्यवहारेदीप्तका-
र्येरविःशुभः ॥ १२१ ॥

अर्थ—मारण, मोहन, स्तंभन, द्वेष, उच्चाटन, वशीकरण, प्रेरण, आकर्षण, क्षोभ, दान, क्रय, विक्रय, प्रेताचें हरण, शत्रुनिग्रह, वैऱ्याशीं युद्ध, भोग, राजदर्शन, भोजन व स्नान या कृत्यांस पिंगला नाडी प्रशस्त होय.

भुक्तमार्गेणमंदाग्नौस्त्रीणांवश्यादिकर्मणि ॥ श-
यनंसूर्यवाहेनकर्तव्यंसर्वदाबुधैः ॥ १२२ ॥ क्रूरा-
णिसर्वकर्माणिचराणिविविधानिच ॥ तानिसि-
द्ध्यंतिसूर्येणनात्रकार्याविचारणा ॥ १२३ ॥

अर्थ—भोजनानें अग्नि मंद करणें, स्त्रियांचें वशीकरण, व शयन हें सर्व सूर्यस्वरावर करावें. सारांश क्रूर व चर अशीं सर्व कर्में सूर्यस्वरावर केलीं असतां सिद्ध होतात, यांत संशय नाहीं.

अथ सुषुम्ना.

क्षणंवामेक्षणंदक्षेयदावहतिमारुतः ॥ सुषुम्ना
साचविज्ञेयासर्वकार्यहरास्मृता ॥ १२४ ॥

अर्थ—वायु, (स्वर) क्षणभर डावेकडे व क्षणांत उजवेकडे जेव्हां वाहतो, तेव्हां सुषुम्ना नाडीचा प्रचार आहे असें जाणावें. ही सुषुम्ना सर्व कार्यांचा नाश करणारी होय.

तस्यांनाड्यांस्थितोवन्हिर्ज्वलतेकालरूपकः ॥ वि-
षवत्तंविजानीयात्सर्वकार्यविनाशनम् ॥ १२५ ॥

अर्थ—त्या सुषुम्ना नाडीचे ठिकाणीं कालरूपी अग्नि नेहमीं प्रज्वलित आहे, तो विषाप्रमाणें कार्यारंभास वर्ज होय; कारण, त्यावर केलेल्या सर्व कार्यांचा नाश होतो.

यदानुक्रममुल्लंघ्ययस्यनाडीद्वयंवहेत् ॥ तदातस्य विजानीयादशुभंनात्रसंशयः ॥ १२६ ॥ क्षणंवामे क्षणंदक्षेविषमंभावमादिशेत् ॥ विपरीतंफलंज्ञेयं ज्ञातव्यंचवरानने ॥ १२७ ॥

अर्थ—जेव्हां क्रम उल्लंघन करून पुरुषाच्या दोन्ही नाड्या वहात असतात, तेव्हां त्या मनुष्यास अशुभ फल आहे असें जाणावें. आतां ज्याची नाडी क्षणांत डावीकडे आणि क्षणांत उजवीकडे वाहते त्यासही विषमभाव (संकट) आलें असें जाणावें. त्यास विपरीत फल प्राप्त होतें.

उभयोरेवसंचारंविषवंतंविदुर्बुधाः ॥ नकुर्यात्क्रूर-सौम्यानितत्सर्वंविफलंभवेत् ॥ १२८ ॥

अर्थ—जेव्हां दोन्ही नाडींचा संचार चालू असतो तेव्हां त्यास विषयुक्त असें ज्ञानी ह्मणतात. यासाठीं त्या उभयात्मक (सुषुम्ना) स्वरावर क्रूर व सौम्य दोन प्रकारचींही कृत्यें करूं नयेत. कारण तीं निष्फळ होतात.

जीवितेमरणेप्रश्नेलाभालाभेजयाजये ॥ विष-मेविपरीतेचसंस्मरेज्जगदीश्वरं ॥१२९॥ ईश्वरे चिंतितेकार्यंयोगाभ्यासादिकर्मच ॥ अन्यत्तत्रन कर्तव्यंजयलाभसुखैषिभिः ॥१३०॥

अर्थ—जीवित, मरण, प्रश्न, लाभ, अलाभ, जय व पराजय या गोष्टी, विषम आणि विपरीत स्वर इत्यादि प्रसंगीं करूं नयेत. एक जगदीश्वराचें स्मरण करावें. ॥ १२९ ॥ ईश्वराचें चिंतन करून नंतर योगाभ्यास आदिकरून पारमार्थिक कृत्य करावें. जय लाभ व सुख यांची इच्छा करणारे लोकांनीं परमार्थाशिवाय दुसरें कर्म करूं नये.

सूर्येणवहमानायांसुषुम्नायांमुहुर्मुहुः ॥ शापंदद्या-
द्वरंदद्यात्सर्वथैवतदन्यथा ॥ १३१ ॥

अर्थ—सूर्यस्वरांत, सुषुम्ना नाडी वारंवार वाहत असतां शाप किंवा वर दिला तर सर्व निरर्थक होतो.

नाडीसंक्रमणेकालेतत्त्वसंगमनेपिच ॥ शुभंकिंचि-
न्नकर्त्तव्यंपुण्यदानानिकोटिधा ॥ १३२ ॥

अर्थ—नाडीचें संक्रमण होण्याचे वेळेस व तत्त्वांचें संक्रमण (चलन) होतांना दान आदिकरून पुण्यकर्मे करावीं. दुसरें शुभकर्म करूं नये.

विषमस्योदयोयत्रमनसाऽपिनचिंतयेत् ॥ यात्राहा-
निकरीतस्यमृत्युःक्लेशोनसंशयः ॥ १३३ ॥

अर्थ—ज्यावेळेस विषमस्वराचा उदय असतो, तेव्हां कोणतेंही कार्य मनांत आणूं नये. विषम स्वरावर जो प्रयाण करतो त्यास मृत्यु प्राप्त होतो आणि अनेक क्लेश प्राप्त होतात. यांत संशय नाहीं.

पुरोवामोर्ध्वतश्चंद्रोदक्षाधःपृष्ठतोरविः ॥ पूर्णरिक्त-
विवेकोयंज्ञातव्योदैशिकैःसदा ॥ १३४ ॥

अर्थ—पुढें डावेकडे आणि ऊर्ध्वचंद्र बली होय, व दक्षिणेकडे खालीं आणि पृष्ठभागीं सूर्य बली होय. यावरून विद्वान् लोकांनीं पूर्ण विरक्त या स्थानांचा विचार करावा.

ऊर्ध्ववामाग्रतोदूतोज्ञेयोवामपथिस्थितः ॥ पृष्ठेदक्षे
तथाऽधस्तात्सूर्यवाहागतःशुभः ॥ १३५ ॥

अर्थ—वाम (चंद्र) स्वर वाहत असतां आलेला दूत ऊर्ध्वभागीं, वामभागीं आणि अधोभागीं आल्यास शुभ जाणावा. तसेंच सूर्य-

स्वर चालत असतां पृष्ठभागीं व दक्षिणभागीं आणि खालीं आलेला दूत शुभसूचक होय.

अनादिर्विषमःसंधिर्निराहारोनिराकुलः ॥ परेसूक्ष्मेविलीयेतसासंध्यासद्भिरुच्यते ॥ १३६ ॥ नवेदंवेदइत्याहुर्वेदोवेदोनविद्यते ॥ परात्माविद्यतेयेनसवेदोवेदउच्यते ॥ १३७ ॥ नसंध्यासंधिरित्याहुः संध्यासंधिर्निगद्यते ॥ विषमःसंधिगःप्राणःससंधिस्संधिरुच्यते ॥ १३८ ॥

॥ इति नाडीभेदः ॥

अर्थ—अनादि, निष्क्रिय, निश्चल असा जो विषमसंधि (सुषुम्ना) तो परतत्त्व जें ब्रह्म त्याचे ठिकाणीं लीन होतो, त्यास संध्या असें साधु ह्मणतात. १३६. प्रसिद्ध वेदास वेद ह्मणत नाहींत. कारण त्याचे ठिकाणीं वेदत्व नाहीं; ज्याच्यायोगानें परमात्मा जाणला जातो, त्यासच साधु वेद ह्मणतात. १३७. तसेंच ब्राह्मण दिवसरात्री यांचे संधीस संध्या करतात त्या संध्येस साधु संधि असें ह्मणत नाहींत, तर विषमसंधिगत (सुषुम्ना नाडींत) असणारा प्राणच संधि होय. १३८.

श्रीदेव्युवाच ॥ देवदेवमहादेवसर्वसंसारतारक स्थितंत्वदीयहृदयेरहस्यंवदमेप्रभो ॥ १३९ ॥

अर्थ—पार्वती ह्मणते, हे देवाधिदेवा शंकरा, तूं या संसारसमुद्रांतून तारणारा आहेस ह्मणून मी विचारतें; आपले हृदयांत असलेलें रहस्य मला सांगावें.

ईश्वर उवाच॥स्वरज्ञानरहस्यात्तुनकाचिन्त्विष्टदेवता॥ स्वरज्ञानरतोयोगीसयोगीपरमोमतः ॥ १४० ॥

अर्थ—शंकर ह्मणतात; हे पार्वती, अत्यंत गोप्य जें स्वरज्ञान या

शिवाय दुसरें रहस्य नाहीं हेंच आमचें इष्ट दैवत होय. स्वरज्ञानीं रममाण जो योगी तोच श्रेष्ठ योगी होय.

पंचतत्त्वाद्भवेत्सृष्टिस्तत्त्वेतत्त्वंप्रलीयते ॥ पंचतत्त्वं परंतत्त्वंतत्त्वातीतंनिरंजनं ॥ १४१ ॥

अर्थ—पंचतत्त्वांपासून सृष्टि उत्पन्न होते, आणि लयही तत्त्वांतच होतो; याकरितां पंचतत्त्वें हेंच मुख्य तत्त्व होय. निर्गुण जो परमात्मा तो या पांच तत्त्वांपासून अगदीं निराळा आहे.

तत्त्वानांनामविज्ञेयंसिद्धियोगेनयोगिनां ॥ भूतानां दुष्टचिन्हानिजानातीहस्वरोत्तमः ॥ १४२ ॥

अर्थ—योगीजनांनीं सिद्धियोगानें (अभ्यासयोगानें) स्वरांतील तत्त्वांचें नांव जाणावें. तत्त्वें व स्वर यांचें ज्यास पूर्ण ज्ञान आहे तो योगी भूतमात्राचीं दुष्ट चिन्हें सहज जाणतो.

पृथिव्यापस्तथातेजोवायुराकाशमेवच ॥ पंचभूतात्मकंविश्वंयोजानातिसपूजितः ॥ १४३ ॥

अर्थ—पृथ्वी, पाणी, तेज, वायु, आणि आकाश हीं जीं भूतें तींच पंचतत्त्वें होत. पंचभूतात्मकच हें सर्व जग आहे: या पांच तत्त्वांस जो जाणतो तोच पूज्य होतो.

सर्वलोकस्थजीवानांनदेहोभिन्नतत्त्वकः ॥ भूलोकात्सत्यपर्यंतंनाडीभेदःपृथक्पृथक् ॥ १४४ ॥

अर्थ—भूलोकापासून सत्यलोकापर्यंत सर्व लोकांतील जीवांचे देहांत तत्त्वें भिन्न भिन्न नाहींत. सर्वांत पंचतत्त्वें (पंचभूतें) सारखींच आहेत. परंतु शरीरांतलि नाड्या मात्र भिन्न भिन्न आहेत.

वामेवादक्षिणेवाऽपिउदयाःपंचकीर्त्तिताः ॥ अष्टधा

तत्त्वविज्ञानंशृणुवक्ष्यामिसुंदरि ॥ १४५ ॥

अर्थ—वाम व दक्षिणभागीं उदय पांच तत्त्वांचें पांच आहेत· हे सुंदरि त्या तत्त्वांचें ज्ञान आठ प्रकारांनीं तुला सागतों.

प्रथमेतत्त्वसंख्यानंद्वितीयेश्वाससंधयः ॥ तृतीयेस्वरचिन्हानिचतुर्थेस्थानमेवच ॥ १४६ ॥ पंचमेतस्यवर्णाश्चषष्ठेतुप्राणएवच ॥ सप्तमेस्वादसंयुक्ता अष्टमेगतिलक्षणम् ॥ १४७ ॥ एवमष्टविधंप्राणं विषुवंतंचराचरम् ॥ ॥ ॥ ॥ ॥

अर्थ—प्रथम प्रकारांत तत्त्वांची संख्या, दुसऱ्यांत श्वासांच्या संधि, तिसऱ्यांत स्वरचिन्हें, चौथ्यांत स्थान, पांचव्यांत तत्त्वांचे रंग, साहव्यांत प्राण, सातव्यांत स्वाद,आणि आठव्या प्रकारांत गतीचें लक्षण, याप्रमाणें आठ प्रकारांनीं चराचरांत व्यापून राहतो त्या प्राणाचें ज्ञान होतें. हे पार्वती या जगांत स्वरतत्त्वज्ञान मुख्य होय त्यावांचून इतर ज्ञान श्रेष्ठ नाहीं.

स्वरात्परतरंदेविनान्यथात्वंबुजेक्षणे ॥ १४८ ॥ निरीक्षितव्यंयत्नेनसदाप्रत्यूषकालतः ॥ कालस्य वंचनार्थायकर्मकुर्वंतियोगिनः ॥ १४९ ॥

अर्थ—प्रभातकालापासून योग्यानें स्वर व त्यांतील तत्त्वांचे उदय मोठ्या दक्षतेनें अवलोकन करावे. कोणतेंही कर्म करीत असतां स्वरोदयाचें अनुसंधान करावें कारण जे स्वरज्ञानी योगी आहेत ते केवळ कालक्षेप करावयासाठीं कर्में करतात परंतु त्यांचें लक्ष तत्त्व व स्वर यांकडेच असतें.

श्रुत्योरंगुष्ठकौमध्यांगुल्यौनासापुटद्वये ॥ वदनप्रांतकेचान्यांगुलीर्दद्याच्चनेत्रयोः ॥ १५० ॥

अर्थ–तत्त्वज्ञान होण्यासाठीं षण्मुखी मुद्रा करावी, ती अशी–दोन्ही कानांत दोन आंगठे द्यावे, नाकपुड्यावर दोन्ही मध्यमा ठेवाव्या, नेत्रांचे ठिकाणीं व मुखप्रांतावर अन्य अंगुली ठेवाव्या ह्मणजे नेत्रावंर तर्जनी ठेवून राहिलेल्या बोटांनीं मुखाचे प्रांत झांकावे. अशा रीतीनें सहा छिद्रें रोधावीं यास षण्मुखी मुद्रा योगी ह्मणतात.

अस्यांतस्तुपृथिव्यादि-तत्त्वज्ञानंभवेत्क्रमात् ॥ पीतश्वेतारुणश्यामै-र्बिंदुभिर्निरुपाधिकम् ॥ १५१ ॥

अर्थ–याच्या आंत पृथ्वी आप आदिकरून तत्त्वांचें क्रमानें ज्ञान होतें. तें असें कीं, वरील षण्मुखी मुद्रा केली असतां पांच रंग दिसतात ते-१ ला पिवळा, २ रा पांढरा, ३ रा तांबडा, ४ था निळा, आणि पांचवा चित्रविचित्र असे पांच. त्यांत क्रमानें पृथ्वीचा पीतवर्ण, आप [पाण्याचा] श्वेतवर्ण, तेजाचा तांबडा, वायूचा निळा आणि आकाशाचा चित्रवर्ण होय असें जाणावें.

दर्पणेनसमालोक्यतत्रश्वासंविनिक्षिपेत् ॥ आकारैस्तुविजानीयात्तत्त्वभेदंविचक्षणः ॥ १५२ ॥

अर्थ–श्वास रोधून कांशाच्या आरशावर सोडावा आणि त्यावर ज्या आकृती दिसतील त्यांवरून विचक्षण मनुष्यानें तत्त्वांचा भेद जाणावा.

चतुरस्रंचार्धचंद्रंत्रिकोणंवर्त्तुलंस्मृतं ॥ बिंदुभिस्तुनभोज्ञेयंआकारैस्तत्त्वलक्षणम् ॥ १५३ ॥

अर्थ–चतुष्कोण, अर्धचंद्र, त्रिकोण, वर्त्तुल आणि अनेक बिंदु या आकारांवरून क्रमानें पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं तत्त्वें उदय पावलीं आहेत असें जाणावें.

मध्येपृथ्वीत्द्यधश्चापश्चोर्ध्वंवहतिचानलः ॥ तिर्यग्वायुप्रवाहश्चनभोवहतिसंक्रमे ॥ १५४ ॥

अर्थ–श्वास वाहतांना नाकपुडीच्या खालीं वर कोठें न लागून मध्येंच वाहत असेल तर पृथ्वी तत्त्व खालच्या भागास झगटून वाहील तर उदक, वरच्या भागास स्पर्श करील तर अग्नि, वांकडा वाहत असल्यास वायु आणि दोनी स्वर बाहेर न येतां आंत वाहत असल्यास आकाशतत्त्व समजावें.

आपःश्वेताःक्षितिःपीतारक्तवर्णोहुताशनः ॥ मारु-
तोनीलजीमूतआकाशःसर्ववर्णकः ॥ १५५ ॥

अर्थ–उदक शुभ्रवर्ण, पृथ्वी पीत, अग्नि रक्तवर्ण, वायु निळा आणि आकाश चित्रवर्ण होय असें जाणावें.

आतां स्थानपरत्वें तत्त्वज्ञान.

स्कंधद्वयेस्थितोवन्हिर्नाभिमूलेप्रभंजनः ॥ जानु-
देशेक्षितिस्तोयंपादांतेमस्तकेनभः ॥ १५६ ॥

अर्थ–अग्नि हा दोन्ही स्कंधांचे ठिकाणीं स्थित आहे, वायु नाभिमूळाचेठायीं, पृथ्वी गुडघ्यांचे ठिकाणीं, उदक पायांच्या शेवटीं आणि आकाश हें मस्तकाचे ठिकाणीं राहतें.

आतां स्वादांवरून तत्त्वज्ञानप्रकार.

माहेयंमधुरंस्वादेकषायंजलमेवच ॥ तीक्ष्णंतेजःस-
मीरोऽम्लआकाशंकटुकंतथा ॥ १५७ ॥

अर्थ–पृथ्वी हें तत्त्व स्वादानें मधुर आहे, पाणी कषाय (तुरट) आहे, तेज तीक्ष्ण, वायु अम्ल [आंबट] आणि आकाश हें कटु आहे.

आतां गतीवरून तत्त्वांचें ज्ञान.

अष्टांगुलंवहेद्वायुरनलश्चतुरंगुलम् ॥ द्वादशांगुलि
माहेयंवारुणंषोडशांगुलम् ॥ १५८ ॥

अर्थ—श्वास वाहतांना किती अंगुलें वाहतो हें पाहून त्यावरून तत्त्व जाणावें. वायु ८ अंगुलें, अग्नि चार अंगुलें, पृथ्वी बारा अंगुलें आणि आप तत्त्व सोळा अंगुलें वाहतें. आकाश हें तेथल्या तेथेंच मोकळें वाहतें.

ऊर्ध्वेमृत्युरधःशांतिस्तिर्यगुच्चाटनंतथा॥ मध्येस्तं-
भंविजानीयात्नभःसर्वत्रमध्यमम् ॥ १५९ ॥

अर्थ—अग्नि हा ऊर्ध्व वाहतो तो मृत्युकारक होय, ह्मणून या तत्त्वांत मारणादिक करावें. आप तत्त्व खालीं वाहतें, तें शांतिकर्मास युक्त होय. वायुतत्त्व वांकडें चालतें,यावर उच्चाटन करावें.पृथ्वी हें तत्त्व मध्यें वाहतें तें स्तंभनास युक्त होय आणि आकाश हें सर्व भागास व्यापून राहतें ह्मणून आकाश मध्यस्थ जाणावें.यावर कांहींएक करूं नये.

पृथिव्यांस्थिरकर्माणिचरकर्माणिवारुणे ॥ तेज-
सिक्रूरकर्माणिमारणोच्चाटनेऽनिले ॥ १६० ॥

अर्थ—पृथ्वीतत्त्वावर स्थिर कर्में, आपतत्त्वावर चर कर्में, तेजावर क्रूर कर्में, आणि वायूवर मारण उच्चाटन इत्यादि कर्में करावीं, ह्मणजे सिद्ध होतात.

व्योम्निकिंचिन्नकर्त्तव्यमभ्यसेद्योगसेवनम् ॥ शू-
न्यतासर्वकार्येषुनात्रकार्याविचारणा ॥ १६१ ॥

अर्थ—आकाश तत्त्व चालत असतां कांहींएक करूं नये. एक योगाभ्यास मात्र करावा. कारण आकाश तत्त्वावर दुसरें कोणतेंही कार्य केलें असतां त्यांत नाश होतो.

पृथ्वीजलाभ्यांसिद्धिःस्यात्मृत्युर्वह्नौक्षयोऽनिले ॥
नभसोनिष्फलंसर्वंज्ञातव्यंतत्त्ववादिभिः ॥ १६२ ॥

अर्थ—पृथ्वी आणि जल हीं तत्त्वें सिद्धिप्रद होत. अग्नि हा मृत्युकारक व वायु हा क्षय करणारा होय. आणि आकाश तत्त्वावर कोणतेंही कृत्य केलें असतां निष्फळ होतें.

चिरलाभःक्षितेर्ज्ञेयस्तत्क्षणेतोयतत्त्वतः ॥ हा-
निःस्याद्वन्हिवाताभ्यांनभसोनिष्फलंभवेत् ॥१६३॥

अर्थ—पृथ्वी तत्त्व चिरकाळानें लाभ देणारें आणि उदक तत्क्षणीं लाभ देणारें होय. अग्नि व वायु या तत्त्वांवर हानि आणि आकाश तत्त्वावर सर्व निष्फल होतें.

पीतःशनिर्मध्यवाहीहनुर्यावद्गुरुध्वनिः ॥ कवो-
ष्णःपार्थिवोवायुःस्थिरकार्यप्रसाधकः ॥ १६४ ॥

अर्थ—पीतवर्ण, हळू चालणारा, हनुवटीपर्यंत खालीं वर न लागतां मध्य स्थितीनें वाहणारा व मोठा शब्द करणारा आणि किंचित् उष्ण असा जो श्वास वायु तो स्थिरकार्य सिद्धि करणारा पार्थिव (पृथ्वी-संबंधी) वायु होय.

अधोवाहीगुरुध्वानःशीघ्रगःशीतलस्थितः ॥ यः
षोडशांगुलोवायुःसआपःशुभकर्मकृत् ॥ १६५ ॥

अर्थ—खालीं वाहणारा, मोठा शब्द करणारा, शीघ्रगति, शीतल व सोळा अंगुळें ज्याचें परिमाण तो आप (उदकसंबंधी) वायु होय. तो शुभकर्माची सिद्धि करणारा होय.

आवर्तगश्चात्युष्णश्चशोणाभश्चतुरंगुलः ॥ ऊर्ध्ववा-
हीचयःक्रूरकर्मकारीसतैजसः ॥ १६६ ॥

अर्थ—भोंवऱ्याप्रमाणें चालणारा,अति उष्ण, रक्तवर्ण व चार अंगुळें ऊर्ध्व वाहणारा जो तैजस वायु, तो क्रूरकर्मांत सिद्धि देणारा होय.

उष्णःशीतःकृष्णवर्णस्तिर्यग्गाम्यष्टकांगुलः ॥ वायुः
पवनसंज्ञस्तुचरकर्मप्रसाधकः ॥ १६७ ॥

अर्थ—शीतोष्ण, कृष्णवर्णाचा, वांकडा व आठ अंगुळें वाहणारा जो श्वास तो वायु श्वास जाणावा. हा चरकार्याच्या सिद्धीस उक्त होय.

यःसमीरःसमरसःसर्वतत्त्वगुणावहः ॥ आंबरंतं
विजानीयात्योगिनांयोगदायकम् ॥ १६८ ॥

अर्थ—जो वायु समरस असतो, ज्यांत सर्व तत्त्वाचे गुण मिश्रित असतात तो आकाशसंबंधी श्वास होय. त्यावर योगाची सिद्धि होय.

पीतवर्णंचतुष्कोणंमधुरंमध्यमाश्रितं ॥ भोगदंपा-
र्थिवंतत्त्वंप्रवाहेद्वादशांगुलम् ॥ १६९ ॥

अर्थ—पृथ्वी तत्त्व रंगानें पिंवळें, आकृतीनें चतुष्कोण, चवीनें मधुर, मध्यस्थानीं वाहणारें, परिमाणानें बारा अंगुलें असें आहे तें अनेक उपभोगदायक असें होय.

श्वेतमर्धेंदुसंकाशंस्वादुकाषायमार्द्रकं ॥ लाभकृद्वा-
रुणंतत्त्वंप्रवाहेषोडशांगुलम् ॥ १७० ॥

अर्थ—श्वेतवर्ण, अर्ध्या चंद्राच्या आकाराचें, तुरट, ओलें आणि प्रवाहीं सोळा अंगुळें तें वारुण ह्मणजे जलतत्त्व होय. या तत्त्वापासून लाभ होतो.

रक्तंत्रिकोणंतीक्ष्णंचऊर्ध्वभागप्रवाहकं ॥ दीप्तंचतै-
जसंतत्त्वंप्रवाहेचतुरंगुलं ॥ १७१ ॥

अर्थ—तेज तत्त्व हें आरक्त वर्ण, त्रिकोण, तिखट, ऊर्ध्व भागीं वाहणारें, देदीप्यमान, आणि प्रवाहांत चार अंगुळें असें आहे.

नीलंचवर्तुलाकारंस्वादाम्लंतिर्यगाश्रितम् ॥ चपलं
मारुतंतत्त्वंप्रवाहेऽष्टांगुलंस्मृतम् ॥ १७२ ॥

अर्थ—वायु तत्त्व हें निळें, आकारानें वर्तुल, स्वादानें अम्ल, वांकडे जाणारें, चपल आणि आठ अंगुलें वाहणारें होय.

वर्णाकारेस्वादवाहेअव्यक्तंसर्वगामिनां ॥ मोक्षदं
नाभसंतत्त्वंसर्वकार्येषुनिष्फलं ॥ १७३ ॥

अर्थ—वर्ण, आकार, स्वाद व वाहण्याची गति या चारी प्रकारांनीं अस्पष्ट जें आकाश तत्त्व तें सर्व प्रवृत्ति कार्यास निष्फल करणारें होय. एक मोक्ष-कृत्यास मात्र हें साधक होतें.

पृथ्वीजलेशुभेतत्त्वेतेजोमिश्रफलोदयम् ॥ हानिमृ-

त्युकरौपुंसामशुभौव्योममारुतौ ॥ १७४ ॥

अर्थ–पृथ्वी आणि जल हीं तत्त्वें शुभ होत, तेजमिश्र (मध्यफल) होय. वायु आणि आकाश हीं तत्त्वे हानि व मृत्यु करणारीं पुरुषांना अत्यंत अशुभ होत.

आपूर्वपश्चिमेपृथ्वीतेजश्चदक्षिणेतथा ॥ वायुश्चोत्त-
रदिग्ज्ञेयोमध्येकोणगतंनभः ॥ १७५ ॥

अर्थ–पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पृथ्वी तत्त्व, दक्षिणेस तेज तत्त्व, उत्तरदिशेस वायु तत्त्व, आणि मध्यदिशेस आकाश तत्त्व, याप्रमाणें हीं तत्त्वें दिशा व्यापून राहतात.

चंद्रेपृथ्वीजलेस्यातांसूर्येऽग्निर्वायदाभवेत् ॥ तदासि-
द्धिर्नसंदेहःसौम्यासौम्येषुकर्मसु ॥ १७६ ॥

अर्थ–चंद्रस्वरांत पृथ्वी व जल, आणि सूर्य स्वरांत अग्नि हीं तत्त्वें चालू असतात तेव्हां क्रमानें सौम्य व क्रूर कार्यांचेठायीं सिद्धि होते, यांत संशय नाहीं.

लाभःपृथ्वीकृतोऽह्निस्या-न्निशायांलाभकृज्जलं ॥ व-
न्हौमृत्युःक्षयोवायुर्नभःस्थानंदहेत्क्वचित् ॥ १७७ ॥

अर्थ–पृथ्वीतत्त्वावरून लाभ होणारा दिवसां होतो. जलतत्त्व रात्रीं लाभदायक होय, अग्नितत्त्वावर मृत्यु, वायु तत्त्वावर क्षय, आणि आकाश तत्त्वावर स्थानदाह होतो.

जीवितव्यजयेलाभेकृष्यांचधनकर्मणि ॥ मंत्रार्थेयुद्ध-
प्रश्नेचगमनागमनेतथा ॥ १७८ ॥

अर्थ–जीवित, जय, लाभ, कृषि, धनकर्म, मंत्रार्थ, युद्धकर्म, प्रश्न, गमन, व आगमन इत्यादि कर्मांचेठायीं पृथ्वी तत्त्व शुभ होय.

आयातिवारुणेतत्त्वेशत्रुरस्तिशुभंक्षितौ ॥ प्रयाति
वायुतोऽन्यत्रहानिमृत्यूनभोऽनले ॥ १७९ ॥

अर्थ–शत्रु आला असतां पृथ्वी व आप हीं तत्त्वें शुभकारक होत.

वायुतत्त्वावर शत्रु आल्यास दुसरीकडे जातो. आकाश व अग्नि या तत्त्वांवर शत्रु आल्यास हानि व मृत्युदायक होय.

पृथिव्यांमूलचिंतास्याज्जीवस्यजलवातयोः ॥ तेजसाधातुचिंतास्याच्छून्यमाकाशतोवदेत् ॥ १८० ॥

अर्थ–कोणी पृच्छक पुसावयास आला तर त्याच्या मनांतील चिंता तत्त्वावरून पहावी. पृथ्वी तत्त्वावर मूल-चिंता (वृक्षादिकांची चिंता) आहे. जल आणि वायु तत्त्वावर जीवचिंता व तेज तत्त्वावर धातुचिंता आहे व आकाश तत्त्वावर शून्य ह्मणजे कांहीं चिंता नाहीं.

पृथिव्यांबहुपादास्युर्द्विपदस्तोयवायुतः ॥ तेजस्येवचतुष्पादोनभसापादवर्जितः ॥ १८१ ॥

अर्थ–पृथ्वीतत्त्वावर पुष्कळ पायांनीं (पुष्कळ सोबत्यांबरोबर) गमन करावें; पाणी आणि वायु या तत्त्वांवर दोन पायांनीं [एकट्यानें] जावें. तेजतत्त्वावर चार पायांनीं [दोघांनीं] जावें; आकाश तत्त्वावर मुळीं कोठें कोणी जाऊं नये.

कुजोवन्हीरविः पृथ्वीसौरिरापः प्रकीर्त्तितः ॥ वायुस्थानस्थितोराहुर्दक्षरंध्रप्रवाहकः ॥ १८२ ॥

अर्थ–दक्षिणनाडी वाहत असतां अग्नितत्त्व वाहतें तो मंगळ, पृथ्वीतत्त्व तो सूर्य, उदक तो शनि आणि वायु तो राहु जाणावा.

जलंचंद्रोबुधःपृथ्वीगुरुर्वातःसितोऽनलः ॥ वामनाड्यांस्थिताः सर्वेसर्वकार्येषुनिश्चिताः ॥ १८३ ॥

अर्थ–वामनाडींत (इडेंत) जलतत्त्व तो चंद्र, पृथ्वीतत्त्व तो बुध, वायु तो गुरु, आणि अग्नितत्त्व तो शुक्र होय. हे ग्रह चंद्रस्वरांतील सर्व कार्यांस शुभ होत.

पृथ्वीबुधोजलादिंदुः शुक्रोवन्हीरविः कुजः ॥ वायूराहुःशनीव्योमगुरुरेवप्रकीर्त्तितः ॥ १८४ ॥

अर्थ–"सुषुम्नानाडींत" पृथ्वीतत्त्व तो बुध, जल तें चंद्र शुक्र, अग्नि-

तत्त्व ते रवि मंगळ, वायु तत्त्व ते राहु शनि, आणि आकाशतत्त्व तो गुरु असें ह्मणतात.

**प्रवासप्रश्नआदित्येयदिराहुर्गतोऽनिले ॥ तदासौ-
चलितोज्ञेयः स्थानांतरमपेक्षते ॥ १८५ ॥**

अर्थ—सूर्यस्वरावर कोणी प्रवासाहून येण्याविषयीं प्रश्न केला आणि त्या वेळेस श्वासांत राहुग्रह असेल तर प्रवासी स्थानांतरांहून निघाला असें जाणावें.

**आयातिवारुणेतत्त्वेतत्रैवास्तिशुभंक्षितौ ॥ प्रवासी
पवनेऽन्यत्रमृत्युरेवानलेभवेत् ॥ १८६ ॥**

अर्थ—उदक तत्त्वावरप्रश्न केल्यास लवकर येतो, पृथ्वीतत्त्वावर विचारिल्यास जेथें गेला असेल तेथेंच सुखी आहे. वायु तत्त्वावर प्रवासी अन्यस्थानीं गेला, आणि अग्नितत्त्वावर मृत्यु प्राप्त झाला असें जाणावें.

**पार्थिवेमूलविज्ञानंशुभंकार्यंजलेतथा ॥ आग्नेयेधातु-
विज्ञानंव्योम्निशून्यंविनिर्दिशेत् ॥ १८७ ॥**

अर्थ—पृथ्वी तत्त्वावर मूलविज्ञान (वृक्षज्ञान) जल तत्त्वावर शुभकार्य, अग्नितत्त्वांवर धातुज्ञान व आकाश तत्त्वावर शून्य जाणावें.

**तुष्टिपुष्टीरतिःक्रीडाजयहर्षौधराजले ॥ तेजोवाय्वो-
श्चसुप्ताक्षोज्वरकंपःप्रवासिनः ॥ १८८ ॥**

अर्थ—पृथ्वी व उदक या तत्त्वांवर कोणी प्रवाशाविषयीं प्रश्न करील तर प्रवासी संतोष, पुष्टता, प्रीति, व क्रीडा यांनीं युक्त आहे, तेज व वायु यांवर पुसल्यास तो क्रमानें निद्रेंत व ज्वरित आहे असें जाणावें.

**गतायुर्मृत्युराकाशेतत्त्वस्थानेप्रकीर्त्तिताः ॥ द्वादशै-
ताःप्रयत्नेनज्ञातव्यादैशिकैःसदा ॥ १८९ ॥**

अर्थ—आकाश तत्त्वावर प्रश्न केल्यास मृत्यु जाणावा. याप्रमाणें बारा प्रश्न तत्त्वें दैवज्ञांनीं प्रयत्नानेंच जाणावींत.

पूर्वायांपश्चिमेयाम्येउत्तरस्यांयथाक्रमम् ॥ पृथि-

व्यादीनिभूतानिबलिष्ठानिविनिर्दिशेत् ॥ १९० ॥

अर्थ–पृथ्वी, आप, तेज आणि वायु हीं तत्त्वें पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या दिशांस क्रमेंकरून बलिष्ठ होत.

पृथिव्यापस्तथातेजोवायुराकाशमेवच ॥ पंचभूतात्मकोदेहोज्ञातव्यश्चवरानने ॥ १९१ ॥

अर्थ–हे सुंदरी, पृथ्वी, पाणी, तेज, वायु आणि आकाश या पंच भूतांपासून हा देह उत्पन्न झाला आहे ह्मणून पंचभूतात्मक आहे असें जाणावें.

अस्थिमांसंत्वचानाडीरोमचैवतुपंचमं ॥ पृथ्वीपंचगुणाप्रोक्ताब्रह्मज्ञानेनभाषितं ॥ १९२ ॥

अर्थ–हाडें, मांस, त्वचा, नाडी, आणि रोम हे पृथ्वीचे गुण होत असें वेदांत शास्त्रांत सांगितलें आहे.

शुक्रशोणितमज्जाश्चमूत्रंलालाचपंचमम् ॥ आपः पंचगुणाःप्रोक्ताब्रह्मज्ञानेनभाषितम् ॥ १९३ ॥

अर्थ–वीर्य, रक्त, मज्जा, मूत्र आणि लाळ हे उदकाचे पांच गुण होत.

क्षुधातृषातथानिद्राकांतिरालस्यमेवच ॥ तेजःपंचगुणंप्रोक्तंब्रह्मज्ञानेनभाषितम् ॥ १९४ ॥

अर्थ–क्षुधा, तृषा, निद्रा, कांति व आलस्य हे पांच तेजोगुण होत

धावनंचलनंग्रंथःसंकोचनप्रसारणे ॥ वायोःपंचगुणाःप्रोक्ताःब्रह्मज्ञानेनभाषितम् ॥ १९५ ॥

अर्थ–धांवणें, चलन, गुंफणें, आखडणें आणि पसरणें हे वायूचे पांच गुण जाणावे.

रागद्वेषौतथालज्जाभयंमोहश्चपंचमः ॥ नभःपंचगुणं प्रोक्तंब्रह्मज्ञानेनभाषितम् ॥ १९६ ॥

अर्थ–राग (प्रीति,) द्वेष, लज्जा, भय आणि मोह हे आकाशाचे पांच गुण होत.

पृथ्व्याःपलानिपंचाशच्चत्वारिंशत्तथांभसः ॥ अग्ने-
स्त्रिंशत्पुनर्वायो-र्विंशतिर्नभसोदश ॥ १९७ ॥

अर्थ–पृथ्वी ५० पळें, उदक ४० पळें, अग्नि ३० पळें, वायु २० पळें आणि आकाश १० पळें वाहतें. याप्रमाणें पंचतत्त्वें २॥ घटिकांत वाहतात.

पृथिव्यांचिरकालेनलाभश्चापःक्षणाद्भवेत् ॥ जाय-
तेपवनेस्वल्पःसिद्धोऽप्यग्नौविनश्यति ॥ १९८ ॥

अर्थ–पृथ्वीतत्त्वावर चिरकालानें लाभ होतो. उदक तत्त्वावर तत्क्षणीं होतो, वायु तत्त्वावर स्वल्प लाभ होतो, अग्नि तत्त्वावर लाभ सिद्ध झाला असला तर नाहींसा होतो.

पृथ्व्याःपंचह्यपांवेदागुणास्तेजोद्विवायुतः ॥ नभ-
स्येकगुणश्चैवतत्त्वज्ञानमिदंभवेत् ॥ १९९ ॥

अर्थ–पृथ्वी पंचगुणात्मक, उदक चतुर्गुण, तेज त्रिगुणात्मक, वायूंत दोन गुण, आणि आकाशांत एक गुण जाणावा.

फूत्कारकृत्प्रस्फुटिताविदीर्णापतिताधरा ॥ ददाति
सर्वकार्येषुअवस्थासदृशंफलम् ॥ २०० ॥

अर्थ–फूत्कार करणारी, फुटलेली, विदीर्ण झालेली, आणि पडलेली अशी पृथ्वी सर्व कार्यांत आपल्या अवस्थेप्रमाणें फल देते.

धनिष्ठारोहिणीज्येष्ठानुराधाश्रवणंतथा ॥ अभि-
जिदुत्तराषाढापृथ्वीतत्त्वमुदाहृतं ॥ २०१ ॥

अर्थ--धनिष्ठा, रोहिणी, ज्येष्ठा, अनुराधा, श्रवण, अभिजित, उत्तराषाढा, हीं नक्षत्रें पृथ्वी तत्त्वांतील जाणावीत.

पूर्वाषाढातथाश्लेषामूलमार्द्राचरेवती ॥ उत्तराभा-
द्रपदातोयतत्त्वंशतभिषक्प्रिये ॥ २०२ ॥

अर्थ--पूर्वाषाढा, आश्लेषा, मूळ, आर्द्रा, रेवती, उत्तराभाद्रपदा आणि शततारका या नक्षत्रांवर उदक तत्त्व जाणावें.

भरणीकृत्तिकापुष्यौमघापूर्वाचफाल्गुनी ॥ पूर्वाभाद्रपदास्वातीतेजस्तत्त्वमितिप्रिये ॥ २०३ ॥

अर्थ--भरणी, कृत्तिका, पुष्य, मघा, पूर्वा, फाल्गुनी, पूर्वाभाद्रपदा आणि स्वाती हें तेजतत्त्व जाणावें.

विशाखोत्तरफाल्गुन्यौहस्तचित्रेपुनर्वसु ॥ अश्विनीमृगशीर्षेचवायुतत्त्वमुदाहृतं ॥ २०४ ॥

अर्थ--विशाखा, उत्तरा, हस्त, चित्रा, पुनर्वसु, अश्विनी व मृग हें वायुतत्त्व होय.

वहन्नाडीस्थितोदूतोयत्पृच्छतिशुभाशुभम् ॥ तत्सर्वंसिद्धिमाप्नोतिशून्येशून्यंनसंशयः ॥ २०५ ॥

अर्थ--वाहते नाडीचेभागीं उभा राहून जो प्रश्न करील त्याच्या प्रश्नांतील शुभाशुभ कार्य सर्व सिद्धीस जातें. आणि शून्य नाडीवर प्रश्न करणाराचें कार्य शून्य होतें असें जाणावें.

पूर्णोऽपिनिर्गमश्वासेसुतत्त्वेऽपिनसिद्धिदः ॥ सूर्यश्चंद्रोतथानृणांसंग्रहेसर्वसिद्धिदः ॥ २०६ ॥

अर्थ--पूर्णश्वास व शुभतत्त्वाचा उदय असूनही जर निर्गमाचे वेळेस (सोडतांना) कोणी कांहीं प्रश्न करील तर तें कार्य सिद्धीस जाणार नाहीं; याप्रमाणेंच चंद्र किंवा सूर्यस्वर असतां पूरकांत सर्व सिद्धि होते.

तत्त्वेरामोजयंप्राप्तः सुतत्त्वेचधनंजयः ॥ कौरवानिहताःसर्वेयुद्धेतत्त्वविपर्ययात् ॥ २०७ ॥

अर्थ--राम हा तत्त्वबळानें जय पावला. तसाच अर्जुनही तत्त्वाच्या योगानें जय पावला. आणि कौरव हे तत्त्वाच्या वैपरीत्यामुळें नाश पावले.

जन्मांतरीयसंस्कारात्प्रसादादथवागुरोः ॥ केषांचिज्जायतेतत्त्ववासनाविमलात्मनां ॥ २०८ ॥

अर्थ--जन्मांतरींच्या संस्कारानें अथवा गुरूच्या कृपेनें स्वच्छ मनाचे विरळ लोकांस तत्त्वज्ञान प्राप्त होतें.

लंबीजंधरणींध्यायेच्चतुरस्त्रांसुपीतभां ॥ सुगं-
धंस्वर्णवर्णाभांप्राप्नुयाद्देहलाघवम् ॥ २०९ ॥

अर्थ–' लं ' हें पृथ्वी तत्त्वाचें बीज होय, हें तत्त्व आकृतीनें चतुष्कोण, सोन्याप्रमाणें पीतवर्ण, व सुगंधयुक्त आहे. या तत्त्वाचें ध्यान करणारास सुगंध, सुवर्णाप्रमाणें कांति व देहाचे ठिकाणीं लघुत्व प्राप्त होतें.

वंबीजंवारुणंध्यायेत्तत्त्वमर्धशशिप्रभं ॥ क्षुत्तृ-
ष्णादिसहिष्णुत्वंजलमध्येचमज्जनं ॥ २१० ॥

अर्थ–जलतत्त्वाचें बीज ' व ' हें होय. त्याचा आकार अर्धचंद्राप्रमाणें जाणावा. या तत्त्वाचें ध्यान करणारास क्षुधा व तृषा सहन होते व पाण्यांत बुडणें हें साध्य होतें.

रंबीजमग्निजंध्यायेत्त्रिकोणमरुणप्रभं ॥ बह्व-
न्नापानभोक्तृत्वंआतपाग्निसहिष्णुता ॥ २११ ॥

अर्थ–अग्नीचें " रं " हें बीज होय. अग्नि तत्त्वाची आकृति त्रिकोण, रंग आरक्त होय. या तत्त्वाचें ध्यान करणारास पुष्कळ अन्न व उदक यांचें पचन होतें. व ऊन आणि अग्नि यांचा ताप सहन होतो.

यंबीजंपवनंध्यायेद्वर्तुलंश्यामलप्रभं ॥ आकाश-
गमनाद्यंचपक्षिवद्गमनंतथा ॥ २१२ ॥

अर्थ–वायु तत्त्वाचें बीज यं हें होय, आकारानें वर्तुल, वर्णानें निळें अशा वायु तत्त्वाचें ध्यान करणारास आकाश--गति, पक्ष्यांप्रमाणें उड्डाण करणें हें प्राप्त होतें.

हंबीजंगगनंध्यायेन्निराकारंबहुप्रभं ॥ ज्ञानं
त्रिकालविषयमैश्वर्यमणिमादिकम् ॥ २१३ ॥

अर्थ–आकाश तत्त्वाचें ' हं ' हें बीज होय. हें तत्त्व निराकार व अनेक वर्णात्मक आहे, याचें ध्यान करणारास त्रिकाळ ज्ञान आणि अणिमादि अष्ट सिद्धि प्राप्त होतात, असें जाणावें.

स्वरज्ञानीनरोयत्रधनंनास्तिततःपरम् ॥ गम्य-
तेस्वरज्ञानेनअनायासंफलंभवेत् ॥ २१४ ॥

अर्थ—स्वरज्ञानासारखें दुसरें धन नाहीं, स्वरज्ञानावर मनुष्य कोणतेंही कार्यास गेला तरी आयास न होतां फलप्राप्ति होते.

श्रीदेव्युवाच ॥ देवदेवमहादेवमहाज्ञानंस्वरोदयम्॥
त्रिकालविषयंचैवकथंभवतिशंकर ॥ २१५ ॥

अर्थ—देवी ह्मणत्ये; हे देवाधिदेवा शंकरा, स्वरापासून त्रिकालज्ञान कसें होतें हें मला कथन करावें.

ईश्वरउवाच ॥ अर्थकालजयप्रश्नशुभाशुभमितित्रि-
धा ॥ एतत्त्रिकालविज्ञानंनान्यद्भवतिसुंदरी ॥२१६॥

अर्थ—शंकर ह्मणतात हे पार्वती, भूत, भविष्य व वर्त्तमान या तीन काळांत जयादिक शुभ आणि अशुभ (पराजयादिक) यांचें ज्ञान स्वरोदयाच्या ज्ञानानेंच होतें. यास अन्य उपाय नाहीं.

तत्त्वेशुभाशुभंकार्यंतत्त्वेजयपराजयौ ॥ त-
त्त्वेसुभिक्षदुर्भिक्षेतत्त्वंत्रिपदमुच्यते ॥ २१७ ॥

अर्थ—तत्त्वावरच शुभाशुभ कार्य, जयपराजय, सुभिक्ष, दुर्भिक्ष हे होतात. तत्त्व हें त्रिपद (कालत्रयाश्रय) आहे, असें ज्ञानी पुरुष ह्मणतात.

श्रीदेव्युवाच ॥ देवदेवमहादेवसर्वसंसारसागरे ॥
किन्नराणांपरंमित्रंसर्वकार्यार्थसाधकं ॥ २१८ ॥

अर्थ—देवी म्हणत्ये; हे देवाधिदेवा, या संसार समुद्रांत मनुष्यांना सर्व कार्यांची सिद्धि करणारा मित्र कोण हें मला सांगावें.

ईश्वरउवाच ॥ प्राणएवपरंमित्रंप्राणएवपरःसखा ॥
प्राणतुल्योपरोबंधुर्नास्तिनास्तिवरानने ॥ २१९ ॥

अर्थ—महादेव ह्मणतात, हे देवि या मनुष्यमात्रास प्राण हाच मुख्य मित्र व सखा (सहाय) आहे. प्राणासारखा अन्य बंधु नाहीं.

श्रीदेव्युवाच ॥ कथंप्राणस्थितोवायुर्देहःकिंप्राणरूप-

कः॥तत्त्वेषुसंचरन्प्राणोज्ञायतेयोगिभिःकथं ॥२२०॥

अर्थ–देवि प्रश्न करते, हे शंकरा, वायु प्राणाचे ठिकाणीं कसा राहतो ? देह प्राणरूप कसा आहे ? आणि तत्त्वांचेठायीं संचार कर-णारा जो प्राण त्यास योगी कसें जाणतात ? हें मला सांगावें.

श्रीशिवउवाच ॥कायानगरमध्यस्थोमारुतोरक्षपाल-
कः॥प्रवेशेदशभिःप्रोक्तोनिर्गमेद्वादशांगुलः ॥२२१॥

अर्थ–शंकर सांगतात, शरीर हेंच कोणी एक नगर यांत वायु र-क्षक होय. तो प्रवेशकालीं १० अंगुळें आणि निघतांना १२अंगुळें वाहतो.

गमनेतुचतुर्विंशन्नेत्रवेदास्तुधावने ॥ मैथुनेपंचषष्टि-
श्चशयनेचशतांगुलं ॥ २२२ ॥

अर्थ–गमनकालीं २४ अंगुळें, धांवतांना ४२ अंगुळें, मैथुनकालीं ६५ अंगुळें आणि निद्रेंत १०० अंगुळें प्राणाची गति होते.

प्राणस्यतुगतिर्देविस्वभावाद्वादशांगुलम् ॥ भोज-
नेवचनेचैवगतिरष्टादशांगुलम् ॥ २२३ ॥

अर्थ–प्राणाचीं स्वाभाविक गति १२ अंगुळें जाणावी. परंतु भोजनाचे वेळेस व बोलतांना १८ अंगुळें गति होते.

एकांगुलंकृतेन्यूनेप्राणेनिष्कामतामता ॥आनंद-
स्तुद्वितीयेस्यात्कविशक्तिस्तृतीयके ॥२२४॥ वा-
चासिद्धिश्चतुर्थेचदूरदृष्टिस्तुपंचमे ॥ षष्ठेत्वाकाशगम-
नंचंडवेगश्चसप्तमे ॥ २२५ ॥

अर्थ–प्राणाची गति १२ अंगुळें ह्मणून सांगितली आहे, त्यांपैकीं एक अंगुल गति योगाभ्यासानें कमी केल्यास निष्कामता प्राप्त होते, दुसरें अंगुल कमी केलें ह्मणजे आनंद होतो, तिसरें अंगुल कमी केल्यास कवित्वशक्ति प्राप्त होते, चौथें अंगुल जिंकल्यास वाचासिद्धि होते, पांचवें अंगुल न्यून केल्यास दूरदृष्टि प्राप्त होते,सहावें जिंकल्यास आकाशगमन आणि सातवें जिंकल्यास प्रचंड वेग प्राप्त होतो.

अष्टमेसिद्धयश्चैवनवमेनिधयोनव ॥ दशमेदशमूर्तिश्चछायानैकादशेभवेत् ॥ २२६ ॥ द्वादशेहंसचारश्चगंगामृतरसंपिबेत् ॥ आनखाग्रंप्राणपूर्णेकस्यभक्ष्यंचभोजनं ॥ २२७ ॥

अर्थ—आठवें अंगुल जिंकल्यास सिद्धि, नववें अंगुल जिंकल्यास नवनिधि प्राप्त होतात. दहावें अंगुल जिंकिलें ह्मणजे दशमूर्तित्व (अनेक रूपें) होतें, अकरा अंगुलें जिंकल्यास साउली नाहींशी होते, आणि बारा अंगुलें जिंकल्यास हंसगति व गंगामृताचें प्राशन होतें. याप्रमाणें प्राणाची गति १२ अंगुलें जिंकिली ह्मणजे तो वायु नखशिखाग्रपर्यंत पूर्ण होतो. मग त्यास अमृतपान होत असल्यामुळें खाणेंपिणें याची गरज राहत नाहीं.

एवंप्राणविधिःप्रोक्तःसर्वकार्यफलप्रदः ॥ ज्ञायतेगुरुवाक्येननविद्याशास्त्रकोटिभिः ॥ २२८ ॥

अर्थ—याप्रमाणें सर्व कार्यांत फलप्रद असा हा प्राणविधि सांगितला. प्राणगतीचा रोध करण्याचा प्रकार गुरुवाक्यानें समजतो, गुरुशिवाय विद्या व कोट्यावधि शास्त्रें यांनीं समजत नाहीं.

प्रातश्चंद्रोरविःसायंयदिदैवान्नलभ्यते ॥ मध्याह्नान्मध्यरात्राच्चपरतस्तुप्रवर्त्तते ॥ २२९ ॥

अर्थ—प्रातःकालीं चंद्र आणि सायंकालीं सूर्य असावा ह्मणजे उत्तम होय; प्रारब्ध योगानें तसें न झाल्यास मध्याह्न व मध्यरात्र यावेळेस ते क्रमानें प्रवृत्त झाले असतां ते शुभ होत.

दूरयुद्धेजयीचंद्रःसमासन्नेदिवाकरः ॥ वहन्नाड्यागतःपादःसर्वसिद्धिप्रदायकः ॥ २३० ॥

अर्थ—दूरयुद्ध कर्त्तव्य असतां चंद्रविजयी होय. आणि निकट युद्धांत सूर्य जयप्रद जाणावा. वाहते नाडीचा पाय प्रथम टाकला असतां सर्वसिद्धि करणारा होतो.

यात्रारंभेविवाहेचप्रवेशेनगरादिके ॥ शुभकार्याणि सिद्ध्यंतिचंद्रचारेषुसर्वदा ॥ २३१ ॥

अर्थ—प्रयाण, लग्न, नगरादिकांत प्रवेश इत्यादि शुभकार्यें चंद्रस्वरावर सर्वकाळ सिद्धिप्रद होतात.

अयनतिथिदिनेशैःस्वीयतत्त्वेचयुक्तेयदिवहतिकदाचिद्दैवयोगेनपुंसां ॥ सजयतिरिपुसैन्यंस्तंभमात्रस्वरेणप्रभवतिनचविघ्नंकेशवस्यापिलोके ॥२३२॥

अर्थ—अयन, तिथि व वार यांच्या स्वामींनीं युक्त आपला स्वर व तत्त्व वाहत असतां जो युद्ध करतो तो स्वराचे स्तंभनमात्रेंकरून शत्रूस जिंकतो. त्यास वैकुंठ लोकांतही विघ्न होत नाहीं.

जीवंरक्षजीवंरक्षजीवांगेपरिधायच ॥ जीवोजपति योयुद्धेजीवन्जयतिमेदिनीं ॥ २३३ ॥

अर्थ—जीवांगाचे ठिकाणीं वस्त्र परिधान करून " जीवं रक्ष जीवं रक्ष " याप्रमाणें जो जप करतो, तो युद्धांत जीवंत राहून सर्व पृथ्वीस जिंकतो.

भूमौजलेचकर्त्तव्यंगमनंशांतिकर्मसु ॥ वन्हौवायौ प्रदीप्तेषुखेपुनर्नोभयेष्वपि ॥ २३४ ॥

अर्थ—भूमि आणि जल या तत्त्वांवर शांत कर्मांविषयीं गमन करावें अग्नि व वायु या तत्त्वांवर दीप्त (उग्र) कर्मांस गमन करावें, आणि आकाश तत्त्वावर दोन्हीं कर्मांस जाऊं नये.

जीवेनशस्त्रंबध्नीयाज्जीवेनैवविकाशयेत् ॥ जीवेन प्रक्षिपेच्छस्त्रंयुद्धेजयतिसर्वदा ॥ २३५ ॥

अर्थ—जीवानें (जिकडची नाडी वाहते त्या हातानें) शस्त्र बांधावें, संजीव हातानें प्रकाशित करावें आणि जिवंत हातानेंच शस्त्र टाकावें, असें केल्यानें नेहेमीं जय प्राप्त होतो.

आकृष्यप्राणपवनंसमारोहेतवाहनं ॥ समुत्तरेपदं

दद्यात्सर्वकार्याणिसाधयेत् ॥ २३६ ॥

अर्थ--वाहनावर चढतांना प्राणवायु आकर्षण करावा. आणि अश्वाचे डाव्या भागीं पाय देऊन चढावें. ह्मणजे सर्व कार्यांची सिद्धि होते.

अपूर्णेशत्रुसामग्रीपूर्णेवास्वबलंतथा ॥ कुरुतेपूर्णतत्त्वस्थोजयत्येकोवसुंधरां ॥ २३७ ॥

अर्थ--अपूर्ण (रिक्त) अंगाकडे शत्रूची सामग्री आणि पूर्ण अंगाकडे आपलें सैन्य करून पूर्ण तत्त्वावर जो युद्ध करतो तो एकटा सर्व पृथ्वीस जिंकतो.

यानाडीवहतेचांगेतस्यामेवाधिदेवता ॥ सन्मुखेऽपि दिशातेषांसर्वकार्यफलप्रदा ॥ २३८ ॥

अर्थ--शरीरांत जी नाडी वाहते त्या नाडीचे ठिकाणीं देवता असते, तेंच अंग सन्मुख दिशेस करावें ह्मणजे सर्व कार्यांची सिद्धि होते.

आदौतुक्रियतेमुद्रापश्चाद्युद्धंसमाचरेत् ॥ सर्पमुद्रा कृतायेनतस्यसिद्धिर्नसंशयः ॥ २३९ ॥

अर्थ--आधीं मुद्रा करून नंतर युद्ध करावें. ज्यानें सर्पमुद्रा केली त्यास निःसंशय सिद्धि होते.

चंद्रप्रवाहेप्यथसूर्यवाहेभटाःसमायांतिचयोद्धुकामाः॥समीरणस्तत्त्वविदांप्रतीतोयाशून्यतासाप्रतिकार्यनाशम्॥२४०

अर्थ--चंद्र किंवा सूर्य कोणताही स्वर वाहत असतां युद्ध करण्याचे इच्छेनें जे वीर येतात ते जर शून्यस्थानीं उभे राहतील तर कार्यनाश (पराजय) पावतील आणि पूर्णस्थानीं उभे राहतील तर जय पावतील, असें स्वर तत्त्ववेत्त्यानें जाणावें.

यांदिशंवहतेवायुर्युद्धंतद्दिशिदापयेत् ॥ जयत्येवनसंदेहःशक्रोऽपियदिचाग्रतः ॥ २४१ ॥

अर्थ--ज्या दिशेस वायु वाहतो त्या दिशेस उभें राहून युद्ध करावें, ह्मणजे इंद्र जरी युद्ध करण्यास आला तरी त्यास तो जिंकतो.

यत्रनाड्यांवहेद्वायुस्तदंगेप्राणमेवच ॥ आकृष्यग-
च्छेत्कर्णांतंजयत्येवपुरंदरं ॥ २४२ ॥

अर्थ—ज्या नाडींत वायु वाहतो, त्याच अंगाचा प्राण आकर्षण करून कानापर्यंत आणावा, असें केल्यानें तो इंद्रासही जिंकतो.

प्रतिपक्षप्रहारेभ्यःपूर्णांगंयोऽभिरक्षति ॥ नतस्य
रिपुभिःशक्तिर्बलिष्ठैरपिहन्यते ॥ २४३ ॥

अर्थ—जो शत्रूच्या प्रहारापासून आपलें पूर्ण अंग रक्षण करतो त्याची शक्ति मोठ्या बलिष्ठ शत्रूंनींही हरण केली जात नाहीं.

अंगुष्ठतर्जनीवंशेपादांगुष्ठेतथाध्वनिः ॥ युद्धका-
लेचकर्त्तव्योलक्षयोद्धाजयीभवेत् ॥ २४४ ॥

अर्थ—अंगुष्ठ व तर्जनी (हाताची) व पायाचा अंगुष्ठ यांठिकाणीं ध्वनि करावा ह्मणजे तो लक्षावधि मनुष्यांशीं युद्ध करून जय मिळवितो.

निशाकरेरवौचारेमध्येयस्यसमीरणः ॥ स्थितो
रक्षेद्दिगंतानिजयकांक्षीगतः सदा ॥ २४५ ॥

अर्थ—चंद्र किंवा सूर्यस्वर चालतांना वायु मध्यें वाहत असल्यास जयेच्छु पुरुषानें दिग्रक्षण करावें.

श्वासप्रवेशकालेतुदूतोजल्पतिवांच्छितम् ॥ त-
स्यार्थःसिद्धिमायातिनिर्गमेनैवसुंदरि ॥ २४६ ॥

अर्थ—श्वास आंत प्रवेश करतांना दूत इच्छित वार्ता जर सांगेल तर तें सर्व कार्य सिद्धीस जातें, श्वास बाहेर पडतांना सांगितलेलें कार्य कधीं होत नाहीं.

लाभादीन्यपिकार्याणिपृष्टानिकीर्तितानिच ॥ जी-
वेविशतिसिद्ध्यंतिहानिर्निःसरणेभवेत् ॥ २४७ ॥

अर्थ—लाभादिक कोणतींही शुभकार्यें, जीवनाडीकडे उभें राहून श्वास आंत जात असतां विचारलेलीं किंवा सांगितलेलीं कार्यें सिद्धीस जातात; आणि श्वासाचे निर्गमकालीं विचारलीं असतां हानिसूचक होतात.

नरेदक्षास्वकीयाचस्त्रियांवामाप्रशस्यते ॥ कुंभको
युद्धकालेचतिस्त्रोनाड्यस्त्रयीगतिः॥ २४८ ॥

अर्थ--पुरुषांस रवि (दक्षिणनाडी) इष्ट होय, स्त्रियांस चंद्र (वामनाडी) इष्ट आणि युद्धकालीं कुंभक प्रशस्त जाणावा. याप्रमाणें तीन नाडींच्या तीन गति जाणाव्या.

हकारस्यसकारस्यविनाभेदंस्वरः कथम् ॥ सोऽ-
हंहंसपदेनैवजीवोजयतिसर्वदा ॥ २४९ ॥

अर्थ--हकार आणि सकार यांचा भेद समजल्यावांचून स्वरज्ञान होत नाहीं, याकरितां हकार व सकार यांचें स्वरूप जाणलें ह्मणजे जीव हंस आणि सोहं या पदानें सर्वोत्कर्षास पावतो.

शून्यांगंपूरितंकृत्वाजीवांगेगोपयेज्जयम् ॥ जीवां-
गेघातमाप्नोतिशून्यांगंरक्षतेसदा ॥ २५० ॥

अर्थ--शून्य अंग असेल तें पूर्ण करून जीवांगाचें रक्षण करावें ह्मणजे जय प्राप्त होतो, जीवांगाचें रक्षण न करून शून्यांगाचें रक्षण केल्यास घात होतो.

वामेवायदिवादक्षेयदिपृच्छतिपृच्छकः ॥ पूर्णेघा-
तोनजायेतशून्येघातंविनिर्दिशेत् ॥ २५१ ॥

अर्थ--डावे किंवा उजवे अंगास पृच्छक युद्धांत गेलेल्याविषयीं प्रश्न करील तर तें अंग पूर्ण असल्यास घात होणार नाहीं. आणि शून्य असल्यास घात होईल असें जाणावें.

भूतत्त्वेनोदरेघातःपदस्थानेंऽबुनाभवेत् ॥ ऊरु-
स्थानेऽग्नितत्त्वेनकरस्थानेचवायुना ॥ २५२ ॥

अर्थ--प्रश्नाचे वेळेस भूमितत्त्व चालत असल्यास पोटाचे ठिकाणीं घात होतो. उदकतत्त्व असतां पायावर, अग्नितत्त्व असल्यास मांड्याचे ठिकाणीं आणि वायुतत्त्व चालत असतां हाताचे ठिकाणीं घात होईल.

शिरसिव्योमतत्त्वेचज्ञातव्योघातनिर्णयः ॥ एवंपं-

चविधोघातःस्वरशास्त्रेप्रकाशितः ॥ २५३ ॥

अर्थ—आकाशतत्त्व चालत असल्यास मस्तकाचे ठिकाणीं घात होतो. याप्रमाणें पांच प्रकारचा घात स्वरशास्त्रांत सांगितला आहे त्यावरून जाणावें.

युद्धकालेयदाचंद्रःस्थायीजयतिनिश्चितं ॥ यदासूर्यप्रवाहस्तुयायीविजयतेतदा ॥ २५४ ॥

अर्थ—युद्धकाळीं जर चंद्रस्वर असेल तर स्थायिक वीराचा जय होतो आणि सूर्यस्वराचा प्रवाह असल्यास चालून आलेल्या वीराचा जय होतो.

जयमध्येतुसंदेहेनाडीमध्यंतुलक्षयेत् ॥ सुषुम्नायां गतेप्राणेसमरेशत्रुसंकटम् ॥ २५५ ॥

अर्थ—जयाविषयीं संशय असल्यास नाडीचें मध्य अवलोकन करावें. प्राण सुषुम्नेंत चालू असल्यास संग्रामांत शत्रूपासून संकट प्राप्त होतें.

यस्यानाड्याभवेच्चारस्तांदिशंयुधिसंश्रयेत् ॥ तदाऽसौजयमाप्नोतिनात्रकार्याविचारणा ॥ २५६ ॥

अर्थ—जी नाडी वाहत असेल त्या नाडीच्या उक्त (चंद्रनाडी असतां पूर्वोत्तरेस व सूर्य असतां दक्षिण पश्चिमेस) दिशेस उभें राहून युद्ध करणारास निश्चयानें जय मिळतो.

यदिसंग्रामकालेतुवामनाडीयदावहेत् ॥ स्थायिनो विजयंविद्यात्रिपुवश्योदयोऽपिच ॥ २५७ ॥

अर्थ—युद्धाचे वेळेस जर वामनाडी वाहत असेल तर स्थायी वीरास जय प्राप्त होतो, शत्रु वश होतात.

यदिसंग्रामकालेतुसूर्यस्तुव्यावृतोवहेत् ॥ तदायायिजयंविद्यात्सदेवासुरमानवे ॥ २५८ ॥

अर्थ—जर संग्रामकालीं सूर्यस्वर वाहूं लागला तर (यायीस) हल्ला करणारास, देव, दैत्य व मनुष्यें यांच्या युद्धांत जय प्राप्त होतो.

रणेहरतिशत्रुस्तंवामायांप्रविशेन्नरे ॥ स्थानंविषुव-

चारेणजयःसूर्येणधावता ॥ २५९ ॥

अर्थ–जो वाम नाडीवर युद्धास प्रयाण करतो त्यास शत्रु जिंकतो. विषुव (सुषुम्ना) नाडीचा संचार असतां जो जातो त्याचें युद्ध न होतां त्यास उगीच कोठें तरी रहावें लागतें. आणि सूर्य नाडीचा प्रचार असतां जो जातो त्यास निश्चयानें जय मिळतो.

युद्धद्वयेकृतेप्रश्नेपूर्णस्यप्रथमेजयः ॥ रिक्तेचैवद्वितीयस्तुजयीभवतिनान्यथा ॥ २६० ॥

अर्थ–दोघांनीं युद्धांत जयाविषयीं प्रश्न केल्यास प्रथम प्रश्न करणार पूर्णस्थानीं असल्यास त्याचा जय होतो. आणि तो रिक्तस्थानीं असल्यास दुसऱ्यास जय प्राप्त होतो.

पूर्णनाडीगतःपृष्ठेशून्यांगंचतदाग्रतः ॥ शून्यस्थाने कृतःशत्रुर्म्रियतेनात्रसंशयः ॥ २६१ ॥

अर्थ--पूर्णनाडीकडे शत्रु असतां त्यास पृष्ठभागीं करावें ह्मणजे त्यास पाठमोरें व्हावें. आणि शून्यस्थानीं असतां त्यास सामोरें व्हावें, कारण शून्यस्थानीं केलेला शत्रु निःसंशय मरण पावतो.

वामचारेसमंनामयस्यतस्यजयोभवेत् ॥ पृच्छको दक्षिणेभागेविजयीविषमाक्षरः ॥ २६२ ॥

अर्थ--कोणी पृच्छक वामभागीं जयाविषयीं प्रश्न करील तर त्याच्या मुखांतून निघालेलीं प्रश्नाक्षरें किंवा ज्याविषयीं पुसतो त्याचीं नामाक्षरें विषम कीं सम हें पहावें. सम असल्यास जय व विषम असल्यास पराजय होतो. दक्षिणभागीं प्रश्न करणाराचीं प्रश्नाक्षरें विषम असल्यास जय व सम असल्यास पराजय होतो.

यदापृच्छतिचंद्रस्यतदासंधानमादिशेत् ॥ पृच्छेद्यदातुसूर्यस्यतदाजानीहिविग्रहम् ॥ २६३ ॥

अर्थ--पृच्छक जर चंद्र स्वरावर युद्ध प्रश्न करील तर संधि [तह] होईल आणि सूर्यस्वरावर पृच्छा केल्यास युद्ध होईल असें जाणावें.

पार्थिवेचसमंयुद्धंसिद्धिर्भवतिवारुणे ॥ युद्धेहितेजसो भंगोमृत्युर्वायौनभस्यपि ॥ २६४ ॥

अर्थ--पृथ्वीतत्त्वावर युद्धास आरंभ झाला असतां युद्धांत बरोबरी होते, जलतत्त्वावर जयप्राप्ति, तेजतत्त्वावर युद्ध भंग, आणि वायु व आकाश या तत्त्वांवर मृत्यु होतो. असें जाणावें.

निमित्तकप्रमादाद्वायदानज्ञायतेऽनिलः ॥ पृच्छा-कालेतदाकुर्यादिदंयत्नेनबुद्धिमान् ॥ २६५ ॥

अर्थ--कांहीं निमित्तानें अथवा प्रमादानें स्वर जेव्हां दक्षिण किंवा उत्तर आहे हें समजत नाहीं, तेव्हां प्रश्नकालीं सुज्ञ मनुष्यानें हा पुढें सांगितलेला यत्न करावा.

निश्चलांधारणांकृत्वापुष्पंहस्तान्निपातयेत् ॥ पूर्णा-गेपुष्पपतनंशून्यंवातत्परंभवेत् ॥ २६६ ॥

अर्थ—निश्चलमनानें शरीर समान करून हातांतून समोरचे जमिनी-वर पुष्प टाकावें, तें ज्या अंगावर जाईल तें पूर्ण अंग व दुसरें शून्य अंग जाणावें.

तिष्ठन्नपविशन्नापिप्राणमाकर्षयन्निजं ॥ मनोभंगम-कुर्वाणःसर्वकार्येषुजीवति ॥ २६७ ॥

अर्थ—कोणतेंही कार्य करतांना उभा राहून किंवा बसून मनोत्साहा-चा भंग न होऊं देतां जो मनुष्य आपल्या प्राणवायूस आंत आकर्ष-ण करतो तो त्या कार्याची सिद्धि करतो.

नकालोविविधंघोरंनशस्त्रंनचपन्नगाः ॥ नशत्रुव्या-धिचोराद्याःशून्यस्थानाशितुंक्षमाः ॥ २६८ ॥

अर्थ—काल, शस्त्र, सर्प, शत्रु, व्याधि आणि चोर हे शून्य स्थानीं असले तर त्या मनुष्याचा नाश करण्यास समर्थ होत नाहींत.

जीवेनस्थापयेद्वायुंजीवेनारंभयेत्पुनः ॥ जीवेनक्री-डतेनित्यंद्यूतेजयतिसर्वथा ॥ २६९ ॥

अर्थ—जीवस्वरानें वायु स्थिर करावा, आणि जीवस्वरानेंच पुनः सोडावा. द्यूत व क्रीडा जीवस्वरावर त्याच अंगानें केली असतां जय प्राप्त होतो.

स्वरज्ञानिबलादग्रेनिष्फलंकोटिधाभवेत् ॥ इहलो-
केपरत्रापिस्वरज्ञानीबलीसदा ॥ २७० ॥

अर्थ—स्वरतत्त्वाचें ज्ञान ज्यास आहे त्यापुढें कोणाचेंही बळ चालत नाहीं. कोणीं त्याविषयीं विरुद्ध कोट्यावधि प्रयत्न केले तरी ते विफळ होतात. स्वरज्ञानी या लोकीं व परलोकीं सर्वकाळ बलिष्ट होय.

दशशतायुतंलक्षंदेशाधिपबलंक्वचित् ॥ शतक्रतुसुरें-
द्राणांबलंकोटिगुणंभवेत् ॥ २७१ ॥

अर्थ--कांहीं राजांस दहा, शंभर, दहा हजार, किंवा लक्षवीरांचें बळ असतें तें या स्वराचेंच बळ होय; इंद्र किंवा ब्रह्मादिक देव यांस कोट्यावधि वीरांचें बळ आहे तेंही स्वरबळच समजावें.

देव्युवाच॥परस्परंमनुष्याणांयुद्धेप्रोक्तोजयस्त्वया ॥
यमयुद्धेसमुत्पन्नेमनुष्याणांकथंजयः ॥ २७२ ॥

अर्थ—पार्वती विचारते, हे शंकरा, मनुष्यांच्या परस्पर युद्धांत जय पराजय तुह्मीं सांगितले. परंतु जर यमाशीं युद्ध करण्याचा प्रसंग आला तर मनुष्यास जय कसा प्राप्त होईल.

ईश्वरउवाच॥ ध्यायेद्देवंस्थिरोजीवंजुहुयाज्जीवसंग-
मे ॥इष्टसिद्धिर्भवेत्तस्यमहालाभोजयस्तथा ॥२७३॥

अर्थ—स्थिर होऊन देवाचें ध्यान करावें. जीवाचा जीव—संगमांत (कुंभकांत) होम करावा. ह्मणजे त्या पुरुषास इष्टसिद्धि, महालाभ व जय हे प्राप्त होतात.

निराकारात्समुत्पन्नंसाकारंसकलंजगत् ॥ तत्सा-
कारंनिराकारंज्ञानेभवतितत्क्षणात् ॥ २७४ ॥

अर्थ—साकार हें सर्व जग निराकारापासून उत्पन्न झालें आहे

ह्मणून ज्ञान झाल्यानंतर साकार तेंच निराकार होतें, याकरितां साकार दृष्टीनें मनुष्य आणि यम यांत तारतम्य आहे. परंतु निराकार दृष्टीनें यम, मनुष्य व कीटक यांची योग्यता सारखीच आहे.

श्रीदेव्युवाच ॥ नरयुद्धंयमयुद्धंत्वयाप्रोक्तंमहेश्व-
र ॥ इदानींदेवदेवानांवशीकरणकंवद ॥ २७५ ॥

अर्थ—पार्वती ह्मणते, हे देवा शंकरा, आपण नरयुद्ध व यमयुद्ध हें सांगितलें. आतां वशीकरणाचा प्रकार मला सांगावा.

ईश्वरउवाच ॥ चंद्रंसूर्येणचाकृष्यस्थापयेज्जीवमं-
डले॥आजन्मवशगारामाकथितेयंतपोधनैः॥ २७६॥

अर्थ—स्वस्त्रीचा चंद्रस्वर चालू असतां आपल्या सूर्यस्वरानें तिचा चंद्रस्वर आकर्षण करून आपले जीवस्वरांत मिळवावा ह्मणजे ती स्त्री जन्मभर आपले स्वाधीन होते असें तपोधन मुनीनीं सांगितलें आहे. परस्त्रीविषयीं असें केल्यास नाश होतो.

जीवेनगृह्यतेजीवोजीवोजीवस्यदीयते ॥ जीवस्थाने
गतोजीवोबालाजीवांतकारकः ॥ २७७ ॥

अर्थ—पुरुषानें आपले जीवस्वरानें स्त्रीचा जीवस्वर ग्रहण करावा आणि स्त्रीचे जीवस्वरांत आपला जीवस्वर द्यावा; याप्रमाणें जीवस्वरांचा संयोग केला असतां त्या स्त्रीस तो पुरुष जन्मभर प्रिय होतो.

रात्र्यंतयामवेलायांप्रसुप्तेकामिनीजने ॥ ब्रह्मजीवं
पिबेद्यस्तुबालाप्राणहरोनरः ॥ २७८ ॥

अर्थ—रात्रीचे शेवटले प्रहरीं स्त्रियांस गाढ झोंप लागली ह्मणजे त्यांचा सुषुम्ना स्वर प्राशन करावा, ह्मणजे त्या स्त्रिया प्राण जायीपर्यंत त्या पुरुषास वश होतात.

अष्टाक्षरंजपित्वातुतस्मिन्कालेगतेसति ॥ तत्क्षणं
दीयतेचंद्रोमोहमायातिकामिनी ॥ २७९ ॥

अर्थ—नंतर तो सुषुम्ना स्वराचा वेळ गेल्यावर अष्टाक्षर मंत्राचा

मप करून मग चंद्रस्वर स्त्रीस द्यावा ह्मणजे ती स्त्री मोह पावते व तत्काळ वश होते.

शयनेवाप्रसंगेवायुवत्यालिंगनेऽपिवा ॥ यःसूर्येण पिबेच्चंद्रंसभवेन्मकरध्वजः ॥ २८० ॥ शिवआलिंग्यतेशक्त्याप्रसंगेदक्षिणेऽपिवा ॥ तत्क्षणाद्दापयेद्य-स्तुमोहयेत्कामिनीशतम् ॥ २८१ ॥

अर्थ–शयनकालीं, आलिंगनाचे वेळीं अथवा अन्य कोणतेही प्रसंगीं जो मनुष्य आपल्या सूर्यस्वरानें स्वस्त्रीच्या चंद्रस्वरास प्राशन करील तो मदनाप्रमाणें तीस मोहकारक होईल ॥ २८० ॥ शिव (सूर्यस्वर) शक्तीनें [चंद्रस्वरानें] अथवा चंद्रस्वर सूर्यस्वरानें मिश्रित करील तो पुरुष तत्क्षणीं शतावधि स्त्रियांना मोहित करील.

सप्तनवत्रयःपंचवारान्संगस्तुसूर्यभे ॥ चंद्रेद्वितुर्यष-ट्कृत्वावश्याभवतिकामिनी ॥ २८२ ॥

अर्थ–आतां स्त्रीच्या सूर्यस्वरांत आपला चंद्रस्वर द्यावयाचा अभ्यास ७,९,३, किंवा ५ वेळां द्यावा. आणि तिचे चंद्रस्वरांत आपला सूर्यस्वर देणें झाल्यास २,४ किंवा ६ वेळां द्याव ह्मणजे ती स्त्री वश होते.

सूर्यचंद्रौसमाकृष्यसर्पाक्रांत्याधरोष्ठयोः ॥ महापद्मेमुखंस्पृष्ट्वावारंवारमिदंचरेत् ॥ २८३ ॥

अर्थ–सूर्य व चंद्र हे स्वर सर्पगतीनें आकर्षण करून एक कमळ आपल्या व स्त्रीच्या ओंठास लावावें. नंतर त्या कमळास मुखानें स्पर्श करून पुनः स्वरांचें मिश्रण करावें. याप्रमाणें वर सांगितलें तितके वेळां वरचेवर असें करावें.

आप्राणमितिपद्मस्ययावन्निद्रावशंगता ॥ पश्चाज्जाग्रतिवेलायांचोष्येतेगलचक्षुषी ॥ २८४ ॥

अर्थ–वर सांगितलेलें कृत्य ती स्त्री जागे होण्याचे पूर्वीं निद्रावश

आहे तोंपर्यंत करावें. मग ती स्त्री जागी झाली असतां तिचा गळा व नेत्र-चुंबन करावें.

अनेनविधिनाकामीवशयेत्सर्वकामिनीः ॥ इदंनवाच्यमन्यस्मिन्नित्याज्ञापारमेश्वरी ॥ २८५ ॥

अर्थ—अशा विधानानें पुरुष स्त्रीच्या स्वराशीं संयोग करीत असतां स्त्रियांस वश करील. परंतु हें प्रकरण कोणाही स्त्रीलंपट मनुष्यास सांगूं नये अशी शंकराची आज्ञा आहे.

॥ इतिवशीकरणम् ॥

॥ अथगर्भप्रकरणम् ॥

ऋतुकालभवानारीपंचमेऽन्हियदाभवेत् ॥ सूर्याचंद्रमसोर्योगेसेवनात्पुत्रसंभवः ॥ २८६ ॥

अर्थ—ऋतुस्नात झालेली स्त्री पंचम दिवशीं पतीसह रममाण होतांना तिचा चंद्रस्वर व पतीचा सूर्यस्वर असेल त्यावेळीं संभोग झाला तर पुत्राचा गर्भ राहून दिव्य पुत्र होतो.

शंखवल्लींगवांदुग्धेपृथ्व्यापोवहतेयदा ॥ भर्तुरेववदेद्वाक्यंदर्पंदेहित्रिभिर्वचः ॥ २८७ ॥

अर्थ—पृथ्वी किंवा उदक तत्त्व चालू असतां ऋतुस्नात स्त्रीनें गायीचे दुधांत शंखवल्ली (सांखवेल) प्राशन करावी. नंतर पतीची संभोग दे म्हणून त्रिवार प्रार्थना करावी.

ऋतुस्नातापिबेन्नारीऋतुदानंतुयोजयेत् ॥ रूपलावण्यसंपन्नोनरसिंहःप्रसूयते ॥२८८ ॥

अर्थ—ऋतुस्नात झालेल्या स्त्रीस वरील औषध पाजून मग पुरुषानें संभोग करावा. म्हणजे रूपवान् व पराक्रमी असा पुत्र उत्पन्न होतो.

सुषुम्नासूर्यवाहेनऋतुदानंतुयोजयेत् ॥ अंगहीनःपुमान्यस्तुजायतेत्रासविग्रहः ॥ २८९ ॥

अर्थ—सूर्यस्वराच्या प्रवाहांत सुषुम्ना स्वर वाहत असतांना जो ऋतुकालीं रतिदान करील त्यास अंगहीन व कुरूपी असा मुलगा होतो.

विषमांकेदिवारात्रौविषमांकेदिनाधिपः ॥ चंद्रनेत्राग्नितत्वेषुवंध्यापुत्रमवाप्नुयात् ॥ २९० ॥

अर्थ—ऋतु प्राप्त झाल्यापासून चार दिवसांनंतर विषम दिवशीं सूर्यस्वर वाहत असतां [अर्थात् स्त्रीचा चंद्रस्वर असतांना] पृथ्वी, उदक, व अग्नि या तत्त्वांवर पुरुषानें गर्भदान केल्यास वंध्येलाही पुत्र होतो.

ऋत्वारंभेरविःपुंसांस्त्रीणांचैवसुधाकरः ॥ उभयोः संगमेप्राप्तेवंध्यापुत्रमवाप्नुयात् ॥ २९१ ॥

अर्थ—ऋतुकाळीं पुरुषाचा रवि आणि स्त्रीचा चंद्र वाहत असून उभयतांचा संगम झाला असतां वंध्येलाही पुत्र होतो.

ऋत्वारंभेरविःपुंसांशुक्रांतेचसुधाकरः ॥ अनेनक्रमयोगेननादत्तेदैवदारुकः ॥ २९२ ॥

अर्थ—ऋतूच्या आरंभीं पुरुषाचा सूर्यस्वर असून वीर्यस्राव झाल्यानंतर चंद्रस्वर चालू झाल्यास महायोग जाणावा. परंतु दैवहीनास हा योग दुर्लभ होय.

चंद्रनाडीयदाप्रश्नेगर्भेकन्यातदाभवेत् ॥ सूर्योभवेत्तदापुत्रोद्वयोर्गर्भोविहन्यते ॥ २९३ ॥

अर्थ—प्रश्नकालीं चंद्रस्वर वाहत असल्यास कन्या गर्भ आहे, आणि सूर्यस्वर असतां पुत्र गर्भ आहे असें जाणावें. दोनी स्वर एकदम (सुषुम्ना) वाहत असल्यास गर्भनाश होतो असें जाणावें.

पृथ्वीपुत्रीजलेपुत्रःकन्यकातुप्रभंजने ॥ तेजसिगर्भपातःस्यान्नभस्यपिनपुंसकः ॥ २९४ ॥

अर्थ—प्रश्नकालीं पृथ्वीतत्त्व असतां कन्या, जलतत्त्व असल्यास पुत्र,

वायु असतां कन्या, तेजतत्त्व असतां गर्भपात, आणि आकाशतत्त्व असल्यास नपुंसक होतो.

चंद्रेस्त्रीपुरुषःसूर्येमध्यमार्गेनपुंसकः ॥ गर्भप्रश्ने यदादूतःपूर्णेपुत्रःप्रजायते ॥ २९५ ॥

अर्थ—चंद्रस्वरावर गर्भप्रश्न केल्यास कन्या, सूर्यस्वरावर पुत्र, व सुषुम्नेवर नपुंसक होतो. प्रश्न करणारानें पूर्ण अंगीं येऊन प्रश्न केल्यास पुत्र होतो असें जाणावें.

शून्येशून्यंयुगेयुग्मंगर्भपातश्चसंक्रमे ॥ तत्त्ववित्स विजानीयात्कथितंतत्तुसुंदरि ॥ २९६ ॥

अर्थ—हे सुंदरि, शून्य अंगीं येऊन विचारिल्यास शून्य जाणावें. आणि दोन्ही स्वर चालू असतां प्रश्न केल्यास जुळें होईल. संक्रमावर (सुषुम्नेंत किंवा स्वर बदलतांना) विचारिलें तर गर्भपात होतो, असें तत्त्ववेत्यानें जाणावें.

गर्भाधानंमारुतेस्याच्चदुःखीदिक्षुख्यातोवारुणेसौख्ययुक्तः ॥ गर्भस्त्रावःस्वल्पजीवश्चवन्हौभोगीभव्यःपार्थिवेनार्थयुक्तः ॥ २९७ ॥

अर्थ--वायु तत्त्वावर गर्भाधान झालें असतां तो पुत्र दुःखी होतो. वरुण (उदक) तत्त्वावर झाल्यास तो प्रसिद्ध व सुखी होतो. अग्नितत्त्वावर झालें तर गर्भस्त्राव होतो, किंवा अल्पायुषी होतो आणि पृथ्वीतत्त्वावर झाल्यास भोगी, भव्य व धानिक असा पुत्र होतो.

धनवान्सौख्ययुक्तश्चभोगवानर्थसांस्थितिः ॥ स्यान्नित्यंवारुणेतत्त्वेव्योम्निगर्भोविनश्यति ॥ २९८ ॥

अर्थ—वरुण तत्त्वावर गर्भ राहिल्यास तो धनवान्, सुखी व भोगी असा होतो. आकाशतत्त्वावर राहिलेला गर्भ नाश पावतो.

माहेंद्रेसुसुतोत्पत्तिर्वारुणेदुहिताभवेत् ॥ शेषेषुगर्भहानिःस्याज्जातमात्रस्यवामृतिः ॥ २९९ ॥

अर्थ—पृथ्वीतत्त्वावर उत्तम पुत्र उत्पन्न होतो व उदक तत्त्वावर कन्या सुंदर होते. इतर तत्त्वावर गर्भधारण झाल्यास गर्भाचा नाश होतो; अथवा जन्मतांच मरतो.

रविमध्यगतश्चंद्रश्चंद्रमध्यगतोरविः ॥ ज्ञातव्यंगु-
रुतःशीघ्रंनवेदशास्त्रकोटिभिः ॥ ३०० ॥

इतिगर्भप्रकरणम्

अर्थ—सूर्यस्वर चालू असतांना चंद्रस्वर चालूं लागतो व चंद्रस्वर चालतांना सूर्यस्वर चालूं लागतो हें मात्र पुरतेपणानें गुरुपासून समजून घ्यावें. कारण गुरूशिवाय कोटिशास्त्रें किंवा वेद अध्ययन केल्यानें हें समजत नाहीं.

अथसंवत्सरफलम्.

चैत्रशुक्लप्रतिपदिप्रातस्तत्त्वविभेदतः ॥ पश्येद्विच-
क्षणोयोगीदक्षिणेचोत्तरायणे ॥ ३०१ ॥

अर्थ—चैत्र शुद्ध प्रतिपदेस व दक्षिणायन आणि उत्तरायण होतें त्या दिवशीं वाहणारे तत्त्वांचे भेदावरून विचक्षण पुरुषानें संवत्सर फल पहावें.

चंद्रोदयस्यवेलायांवहमानाऽथतत्त्वतः ॥ पृथिव्या-
पस्तथावायुःसुभिक्षंसर्वसस्यजम् ॥ ३०२ ॥

अर्थ—चंद्रोदयावर ह्मणजे चंद्रस्वर चालू असतां जर प्रातःकालीं उत्थान होईल आणि चंद्रस्वरांत पृथ्वी, उदक व वायु हीं तत्त्वें चालू असतील तर सर्व धान्यांचें सुभिक्ष होईल असें समजावें.

तेजोव्योम्नोर्भयंघोरंदुर्भिक्षंकालतत्त्वतः ॥ एवंतत्त्व-
फलंज्ञेयंवर्षेमासेदिनेष्वपि ॥ ३०३ ॥

अर्थ—तेज आणि आकाश हीं तत्त्वें चालत असतां दुर्भिक्ष होईल असें काल, स्वर व तत्त्व यांवरून जाणावें, याचप्रमाणें वर्ष, महिना आणि दिवस यांचे ठिकाणीं तत्त्वावरून फल जाणावें.

मध्यमाभवतिक्रूरादुष्टासर्वेषुकर्मसु ॥ देशभंगमहा-
रोगाःक्लेशकष्टादिदुःखदाः ॥ ३०४ ॥

अर्थ—मध्यनाडी.(सुषुम्ना) फार क्रूर आणि सर्व कार्यांस दुष्ट होय. ही चैत्र प्रतिपदेस प्रातःकाळीं वाहत असल्यास देशभंग, महारोग, श्रम, कष्ट इत्यादि अनेक दुःखें देशांत होतात.

मेषसंक्रांतिवेलायांस्वरभेदंविचारयेत् ॥ संवत्सर-
फलंब्रूयाल्लोकानांतत्त्वचिंतकः ॥ ३०५ ॥

अर्थ—मेष संक्रांतीचे वेळेस स्वरभेदाचा विचार करावा, आणि स्वरांतील तत्त्वांचें विवेचन करून संवत्सर फल सांगावें.

पृथिव्यादिकतत्त्वेनदिनमासाब्दजंफलम् ॥ शोभ-
नंचयथादुष्टंव्योममारुतवन्हिभिः ॥ ३०६ ॥

अर्थ—पृथिव्यादि तत्त्वांवरून दिवस मास व वर्ष यांचें फळ जाणावें, त्यांत पृथ्वी व आप हीं तत्त्वें चालू असतां शुभ फळ आणि आकाश, वायु व अग्नि या तत्त्वांवर दुष्ट फल समजावें.

सुभिक्षंराष्ट्रवृद्धिःस्याद्बहुसस्यावसुंधरा ॥ बहुवृष्टि-
स्तथासौख्यंपृथ्वीतत्त्वंवहेद्यदि ॥ ३०७ ॥

अर्थ—मेषसंक्रांतीचे वेळीं प्रथम पृथ्वीतत्त्व वाहत असतां सुपीक, देशाची वृद्धि, धान्याची प्रचुरता, पुष्कळ वृष्टि आणि सौख्य हीं फळें प्राप्त होतात.

अतिवृष्टिःसुभिक्षंस्यादारोग्यंसौख्यमेवच ॥ बहु-
सस्यातथापृथ्वीअप्तत्त्वंवैवहेद्यदि ॥ ३०८ ॥

अर्थ—उदकतत्त्व वाहत असल्यास अतिवृष्टि, सुभिक्ष, आरोग्य, सौख्य व पुष्कळ धान्यांची उत्पत्ति हीं फळें होतात.

दुर्भिक्षंराष्ट्रभंगःस्यादुत्पत्तिश्चविनश्यति ॥ अल्पा-
दल्पतराद्वृष्टिरग्नितत्त्वंवहेद्यदि ॥ ३०९ ॥

अर्थ—अग्नितत्त्व वहात असल्यास दुर्भिक्ष, देशभंग, संततीचा

व धान्योत्पत्तीचा नाश आणि अत्यल्प वृष्टि हीं फळें होतात.

उत्पातोपद्रवाभीतिरल्पावृष्टिःस्युरीतयः ॥ मेषसं-
क्रांतिवेळायांवायुतत्त्वंवहेद्यदि ॥ ३१० ॥

अर्थ–उल्कापातादि अरिष्टें, भीति, अल्पवृष्टि व ईति (आवर्षण,) अति वृष्टि, इत्यादि सहा पिकांचीं विघ्नें ह्यां मेषसंक्रांतीचे वेळेस वायुतत्त्व वहात असतां होतात.

मेषसंक्रांतिवेळायांव्योमतत्त्वंवहेद्यदि ॥ तत्रापि
शून्यताज्ञेयासस्यादीनांसुखस्यच ॥ ३११ ॥

अर्थ–मेषसंक्रांतीचे वेळेस आकाशतत्त्व वाहत असल्यास धान्यादिकांची व सुखाची शून्यता होईल असें जाणावें.

पूर्णप्रवेशनेश्वासेसस्यंतत्त्वेनसिद्धयति ॥ सूर्यचंद्रे-
न्यथाभूतेसंग्रहःसर्वसिद्धिदः ॥ ३१२ ॥

अर्थ–पूर्ण व आंत प्रवेश करणारे श्वासास वर सांगिल्याप्रमाणें तत्त्वावरून धान्यसिद्धि होते. परंतु तत्त्वोदयाचे वेळेस सूर्य व चंद्र स्वर हे जर विपरीत होतील म्हणजे चंद्राचे योगीं सूर्य व सूर्याचे योगीं चंद्र येईल तर मात्र धान्याचा संग्रह करावा, म्हणजे सुखप्रद होतो.

विषमेवह्नितत्त्वंस्याज्ज्ञायतेकेवलंनभः ॥ तत्कु-
र्याद्वस्तुसंग्राहोद्विमासेचमहर्घता ॥ ३१३ ॥

अर्थ–विषम (दक्षिण) स्वरांत प्रथम अग्नितत्त्व असून पुढें जर आकाशतत्त्व प्रगट होईल तर सर्व वस्तूंचा संग्रह करावा. कारण दोन महिन्यांत सर्व वस्तूंची महर्घता होते.

रवौसंक्रमतेनाडीचंद्रमंतेप्रसर्पिता ॥ खानिले
वह्नियोगेनरौरवंजगतीतले ॥ ३१४ ॥

॥ इतिसंवत्सरप्रकरणम् ॥

अर्थ–रात्र संपण्याचे वेळेस चंद्रस्वर वाहत असून प्रातःकाळीं जर सूर्यनाडीगत स्वर होईल आणि त्या स्वरांत आकाश, वायु व अग्नि

हीं तत्त्वें उदय पावतील तर पृथ्वीतळावर अनेक अनर्थ होऊन जनांस यातना होतील.

॥ अथरोगप्रकरणम् ॥

महीतत्त्वेस्वरोगश्चजलेचजलमातृतः ॥ तेजसिखेटवाटीस्थशाकिनीपितृदोषतः ॥ ३१५ ॥

अर्थ—पृथ्वी तत्त्वावर रोग प्रश्न केला तर शारीर रोग समजावा; जलतत्त्वावर जलमातृका संबंधी पीडा आहे, तेजतत्त्व प्रश्नकालीं असतां खेडेवाडी येथील शाकिनी किंवा पितर यांचा दोष आहे असें जाणावें.

आदौशून्यगतोदूतःपश्चात्पूर्णोविशेद्यदि ॥ मूर्च्छितोऽपिध्रुवंजीवेद्यदर्थंप्रतिपृच्छति ॥ ३१६ ॥

अर्थ--पृच्छा करणारा प्रथम शून्य अंगास येऊन पुनः पूर्ण अंगास जर जाईल तर ज्यासाठीं प्रश्न करतो तो मनुष्य मूर्च्छित असला तरी जीवंत राहतो.

यस्मिन्नंगेस्थितोजीवस्तत्रस्थःपरिपृच्छति ॥ तदा जीवतिजीवोऽसौयदिरोगैरुपद्रुतः ॥ ३१७ ॥

अर्थ—जें अंग पूर्ण आहे तिकडे उभा राहून प्रश्न केल्यास तो मनुष्य अनेक रोगांनीं जरी उपद्रुत असला तरी जीवंत राहील.

दक्षिणेनयदावायुर्दूतोरौद्राक्षरोवदेत् ॥ तदाजीवतिजीवोऽसौचंद्रेसमफलंभवेत् ॥ ३१८ ॥

अर्थ--आतां वायु दक्षिण नाडींत असतां दूत येऊन रौद्र (क्रूर) अक्षरें जर बोलेल तर तो रोगी वांचेल असें जाणावें. जर क्रूर भाषणकालीं चंद्र वाहूं लागेल तर शुभ फळ जाणावें.

जीवाकारंचवाधृत्वाजीवाकारंविलोक्यच ॥ जीवस्थोजीवितप्रश्नेतस्यस्याज्जीवितंफलम् ॥ ३१९ ॥

अर्थ--जीवाची आकृति हातांत धरून आणि जीवाच्या आकारा-

कडे बघून जीव (पूर्ण) अंगास उभा राहून जो जीविताविषयीं प्रश्न करील त्याचें जीवित सफल होईल.

वामचारेतथादक्षप्रवेशेयत्रवाहने ॥ तत्रस्थःपृच्छ-
तेदूतस्तस्यसिद्धिर्नसंशयः ॥ ३२० ॥

अर्थ--वाम (इडा) किंवा दक्षिण (पिंगला) नाडींतून वायु संचार किंवा प्रवेश करीत असतां दूत जीवांगीं उभा राहून प्रश्न करील तर त्यास इष्टसिद्धि होते यात संशय नाहीं.

प्रश्नेचाधःस्थितोजीवोनूनंजीवोहिजीवति॥ऊर्ध्वचार-
स्थितोजीवोजीवोयातियमालयम् ॥ ३२१ ॥

अर्थ--प्रश्न करतेवेळीं जो अधोभागीं असेल तो जीवन पावतो. आणि जो ऊर्ध्व उभा राहून प्रश्न करतो तो यमालयास जातो असें जाणावें.

विपरीताक्षरप्रश्नेरिक्तायांपृच्छकोयदि ॥ विपर्ययं
चविज्ञेयंविषमस्योदयेसति ॥ ३२२ ॥

अर्थ--विपरीत अक्षरांनीं प्रश्न करून पृच्छक जर रिक्त नाडीकडे उभा राहील व त्यावेळेस विषम (सुषुम्ना) नाडीचा उदय होईल तर विपरीत फळ जाणावें.

चंद्रस्थानेस्थितोजीवःसूर्यस्थानेतुपृच्छकः ॥ तदा
प्राणवियुक्तोऽसौयदिवैद्यशतैर्वृतः ॥ ३२३ ॥

अर्थ--जीव (श्वासवायु) चंद्रनाडींत असतां सूर्यस्थानीं उभा राहून पृच्छक ज्या रोग्याविषयीं प्रश्न करील तो शतावधि वैद्यानीं औषध दिलें तरी प्राणाशीं वियोग पावतो.

पिंगलायांस्थितोजीवोवामेदूतस्तुपृच्छति ॥ तदाऽ-
पिम्रियतेरोगीयदित्रातामहेश्वरः ॥ ३२४ ॥

अर्थ--श्वास पिंगला नाडींत असतां जर दूत वामभागीं उभा राहून रोग प्रश्न करील तर त्यास साक्षात् शंकर ही त्राता असला तरी

मरण प्राप्त होतें. असें जाणावें.

एकस्यभूतस्यविपर्ययेणरोगाभिभूतिर्भवतीहपुंसां ॥ तयोर्द्वयोर्बंधुसुत्द्वाद्विपत्तिःपक्षद्वयेव्यत्ययतोमृतिः स्यात् ॥ ३२५ ॥

अर्थ–एका भूताचें [तत्त्वाचें] वैपरीत्य झालें तर त्या पुरुषास रोगापासून फार उपद्रव होतो; दोन भूतांत विपर्यय झालें तर बंधु व इष्टमित्र यांचा नाश होतो. आणि दोन्ही पक्षीं व्यत्यय घडल्यास रोगी मरण पावतो.

॥ इति रोगप्रकरणम् ॥

॥ अथ कालप्रकरणम् ॥

मासादौचैवपक्षादौवत्सरादौयथाक्रमम् ॥ क्षयकालंपरीक्षेतवायुचारवशात्सुधीः ॥ ३२६ ॥

अर्थ–महिन्याच्या पंधरवड्याच्या आणि वर्षाच्या आरंभीं वायूच्या संचारावरून सुज्ञानें क्षयकाल जाणावा.

पंचभूतात्मकंदीपंशिवस्नेहेनसिंचितम् ॥ रक्षयेत्सूर्यवातेनप्राणीजीवोस्थिरोभवेत् ॥ ३२७ ॥

अर्थ–हा पंचभूतात्मक दीप शिवरूपी स्नेहानें भरलेला आहे यास सूर्यरूप वायूनें सुरक्षित ठेवावा, ह्मणजे जीव स्थिर होतो.

मारुतंबंधयित्वातुसूर्यंबंधयतेयदि ॥ अभ्यासाज्जीवतेजीवःसूर्यकालेऽपिवंचिते ॥ ३२८ ॥

अर्थ–वायूस रोध करून सूर्य आहे तोंपर्यंत (दिवसभर) सूर्यस्वर बंद ठेवावा आणि सूर्यास्त झाल्यावर सूर्यस्वर चालू करावा, अशा अभ्यासानें मनुष्य पुष्कळ दिवस जगतो.

गगनात्स्रवतेचंद्रःकायापद्मानिसिंचयेत् ॥ कर्मयोगसदाभ्यासैरमरःशशिसंश्रयात् ॥ ३२९ ॥

अर्थ–ब्रह्माडांतील आकाशा पासून चंद्रस्राव होऊन शरीररूप

कमळ प्रफुल्लित होतें. याकरितां चंद्राचा आश्रय करून कर्मयोगाचा अभ्यास केल्यानें योगी अमर होतो.

शशांकंवारयेद्रात्रौदिवावार्योदिवाकरः ॥ इत्यभ्या-
सरतोनित्यंसयोगीनात्रसंशयः ॥ ३३० ॥

अर्थ--रात्रीं चंद्रस्वर निवारण करावा आणि दिवसां सूर्य निवारण करावा. याप्रमाणें अभ्यास करणारा मनुष्य योगी होतो यांत संशय नाहीं.

अहोरात्रेयदेकत्रवहतेयस्यमारुतः ॥ तदातस्यभ-
वेन्मृत्युःसंपूर्णेवत्सरत्रये ॥ ३३१ ॥

अर्थ--ज्या मनुष्याच्या एकाच नाडींतून रात्रीं व दिवसां (एक-अहोरात्र) श्वास वायु वाहतो तो मनुष्य तीन वर्षांनीं मृत्यु पावतो.

अहोरात्रद्वयंयस्यपिंगलायांसदागतिः ॥ तस्यव-
र्षद्वयंप्रोक्तंजीवितंतत्त्ववेदिभिः ॥ ३३२ ॥

अर्थ--दोन अहोरात्रें ज्याच्या दक्षिण नाडींत वायूची गति असते, त्याचें आयुष्य दोन वर्षें आहे असें स्वरतत्त्वाचे ज्ञाते म्हणतात.

त्रिरात्रेवहतेयस्यवायुरेकपुटेस्थितः ॥ तदासंवत्स-
रायुस्तंप्रवदंतिमनीषिणः ॥ ३३३ ॥

अर्थ--ज्याचा श्वास वायु एका नाडींत तीन दिवस वाहतो तो मनुष्य एक वर्ष वांचतो, असें विद्वान ह्मणतात.

रात्रौचंद्रोदिवासूर्योवहेद्यस्यनिरंतरम् ॥ जानीया-
त्तस्यवैमृत्युःषण्मासाभ्यंतरेभवेत् ॥ ३३४ ॥

अर्थ--ज्या मनुष्याचा चंद्रस्वर रात्रीं व सूर्यस्वर दिवसां नेहमीं वाहत असेल त्या मनुष्याचा सहा महिन्यांचे आंत मृत्यु होईल असें जाणावें.

लक्ष्यंलक्षितलक्षणेनसलिलंभानुर्यदादृश्यते,क्षीणो
दक्षिणपश्चिमोत्तरपुरःषट्त्रिद्विमासैकतः॥मध्यंछिद्र-

मिदंभवेद्दशदिनंधूमाकुलंतद्दिने,सर्वज्ञैरपिभाषितंमुनिवरैरायुःप्रमाणंस्फुटं ॥ ३३५ ॥

अर्थ—आकाशांत पाणी ठेवून त्यांत सूर्याचें प्रतिबिंब अवलोकन करावें, तें प्रतिबिंब दक्षिणेस क्षीण दिसत असेल तर सहा महिन्यांनीं मृत्यु, पश्चिमेस क्षीण असल्यास तीन महिन्यांनीं, उत्तरेस क्षीण दिसल्यास दोन महिन्यांनीं, पूर्वेस क्षीण असल्यास एक महिन्यानें, मध्यें छिद्र दिसलें तर १० दिवसांनीं आणि सर्व प्रतिबिंब धुरकट दिसेल तर तेच दिवशीं मृत्यु होतो. याप्रमाणें सर्वज्ञ मुनींनीं आयुष्याचे प्रमाण सांगितलें आहे.

दूतोरक्तकषायकृष्णवसनोदंतक्षतोमुंडितःतैलाभ्यक्तशरीररज्जुककरोदीनश्चपूर्णोत्तरः ॥ भस्मांगारकपालपाशमुशलीसूर्यास्तमायातियःकालीशून्यपदस्थितोगदयुतःकालानलस्याद्दतः ॥ ३३६ ॥

अर्थ—दूत अथवा रोगी तांवडें, भगवें अथवा काळें वस्त्र नेसून अथवा तैलाभ्यंग करून हातीं रज्जू घेऊन दंतक्षतयुक्त, मुंडन केलेला व दीन असा पूर्णस्वरावर जरी आला तरी व्यर्थ होय. भस्म, अग्निकपाल, पाश आणि मुसळ घेऊन सूर्यास्ताचे वेळेस शून्यस्वरावर दूत येईल तर तो रोगी मृत्यूच्या स्वाधीन होतो असें जाणावें.

अकस्माच्चित्तविकृतिरकस्मात्पुरुषोत्तमः ॥ अकस्मादिंद्रियोत्पातःसन्निपाताग्रलक्षणम् ॥ ३३७ ॥

अर्थ—अकस्मात् चित्ताला विकार झाल्यास एकाएकीं प्रकृतींत मोठा बदल झाल्यास अथवा निष्कारण इंद्रियांत उत्पात (दुश्चिन्ह) होऊं लागल्यास सन्निपाताचें लक्षण जाणावें.

शरीरंशीतलंयस्यप्रकृतिर्विकृताभवेत् ॥ तदरिष्टंसमासेनव्यासतस्तुनिबोधमे ॥ ३३८ ॥

अर्थ—शरीर अकस्मात् थंड पडतें व प्रकृति अगदीं विलक्षण विका-

रास पावते तेंही अरिष्ट जाणावें. याप्रमाणें संक्षेपेंकरून अरिष्टें सांगितलीं, आतां विस्तारें करून सांगतों.

दुष्टशब्देषुरमतेशुद्धशब्देषुचाप्यति ॥ पश्चात्तापो भवेद्यस्यतस्यमृत्युर्नसंशयः ॥ ३३९ ॥

अर्थ—जो दुष्ट शब्द ऐकून रममाण होतो आणि शुद्धशब्द ऐकले असतां पश्चात्ताप पावतो तो मरणोन्मुख होय.

हुंकारःशीतलोयस्यफूत्कारोवन्हिसन्निभः ॥ महावैद्योभवेद्यस्यतस्यमृत्युर्भवेद्धृवम् ॥ ३४० ॥

अर्थ--ज्याच्या नाकांतील हुंकार थंड असतो आणि तोंडांतील फूत्कार अग्निसारखा तप्त असतो त्यास महावैद्य रक्षण करीत असतांही मरण येतें.

जिव्हांविष्णुपदंध्रुवंसुरपदंसन्मातृकामंडलम्,एतान्येवमरुंधतीममृतगुंशुक्रंध्रुवंवाक्षणम् ॥ एतेष्वेकमपिस्फुटंनपुरुषःपश्येत्पुरःप्रेषितः ॥ सोऽवश्यंविशतीहकालवदनंसंवत्सरादूर्ध्वतः ॥ ३४१ ॥

अर्थ--जीभ, आकाश, ध्रुव, देवमार्ग, मातृका, अरुंधती, चंद्र, शुक्र आणि अगस्त्य यामध्यें कोणता एकही पदार्थ ज्या पुरुषास पुढें असून स्पष्ट दिसत नाहीं तो अवश्य एक वर्षानें कालाचे मुखांत प्रवेश करतो.

अरश्मिबिंबंसूर्यस्यवन्हेःशीतांशुमालिनः ॥ दृष्ट्वैकादशमासायुर्नरश्चोर्ध्वंनजीवति ॥ ३४२ ॥

अर्थ--ज्या मनुष्यास सूर्याचें आणि चंद्राचें बिंब व अग्नि किरणरहित दिसतो त्यास अकरा महिने आयुष्य आहे असें समजावें. त्यावर तो वांचत नाहीं.

वाप्यांपुरीषमूत्राणिसुवर्णरजतंतथा ॥ प्रत्यक्षमथवास्वप्नेदशमासान्नजीवति ॥ ३४३ ॥

अर्थ--स्वप्नांत किंवा जागृतींत जो मनुष्य विहिरींत मलमूत्राचा उ-

त्सर्ग करतो व तेथें ज्यास सोनें व रुपें दिसतें तो मनुष्य पूर्ण दहा महिने जगत नाहीं.

क्वचित्पश्यतियोदीपंसुवर्णंचकषान्वितं ॥ विरूपाणि
चभूतानिनवमासान्नजीवति ॥ ३४४ ॥

अर्थ—दीप हा ज्यास कधीं कधीं सुवर्णाप्रमाणें पिवळा आणि कधीं कषाययुक्त (कृष्णवर्ण) दिसतो, व सर्व भूतें विपरीत (विरूप) दिसतात तो नऊ महिन्यांवर जगत नाहीं.

स्थूलांगोऽपिकृशःकृशोऽपिसहसास्थूलत्वमालभ्यते॥
प्राप्तोवाकनकप्रभांयदिभवेत्क्रूरोऽपिकृष्णच्छविः ॥
शूरोभीरुसुधीरधर्मनिपुणःशांतोविकारीपुमानित्ये-
वंप्रकृतिःप्रयातिचलनंमासाष्टकंजीवति ॥ ३४५ ॥

अर्थ—जो स्थूल असून एकदम रोड होतो किंवा रोड असून एकदम लठ्ठ होतो, क्रूर व काळा मनुष्य एकाएकी सुवर्णासारखा व शांत होतो, शूर असून भितरा, धार्मिक असून अधर्मनिष्ठ व शांत असून चंचल होतो याप्रमाणें ज्याची प्रकृति शीघ्र विकृतीस पावते तो आठ महिने वांचतो.

पीडाभवेत्पाणितलेचजिव्हामूलेयथास्याद्रुधिरंच
कृष्णं ॥विद्धंनचग्लायतियत्रदष्ट्वाजीवेन्मनुष्यःस-
हिसप्तमासम् ॥ ३४६ ॥ मध्यांगुलीनांत्रितयंनव-
क्रंरोगंविनाशुष्यतियस्यकंठः ॥ मुहुर्मुहुःप्रश्नवशे-
नजाड्यात्षड्भिःसमासैःप्रलयंप्रयाति ॥ ३४७ ॥

अर्थ—ज्यास तळहात व जिव्हामूल या ठिकाणीं पीडा होते, रक्त काळें होतें व तें टोंचलें असतां गळत नाहीं तो मनुष्य सात महिने जगतो. ३४६ ज्याचीं मधील तीन बोटें वांकडीं होत नाहींत, रोगावांचून कंठ शुष्क होतो, पूर्वानुसंधान नसल्यामुळें वारंवार प्रश्न करतो आणि ज्यास जडत्व प्राप्त होतें तो मनुष्य सहा महिन्यांनीं मरण पावतो.

नयस्यमरणांकिंचिद्विद्यतेस्तनचर्माणि ॥ सोऽवश्यंपं-
चमेमासिस्कंधारूढोभविष्यति ॥ ३४८ ॥

अर्थ—ज्याचें स्तनसंबंधीं चर्म बधिर होतें व ज्यास स्मरण नाहींसें होतें तो पांचवे महिन्यांत मरण पावतो.

यस्यनस्फुरतिज्योतिःपीड्यतेनयनद्वयम् ॥ मरणं
तस्यनिर्दिष्टंचतुर्थेमासिनिश्चितम् ॥३४९॥

अर्थ—ज्यास तेज दृष्टिगोचर होत नाहीं, आणि ज्याचे नेत्र पीडित होतात त्यास चौथ्या महिन्यांत मरण निश्चित येतें.

दंताश्चवृषणौयस्यनकिंचिदपिपीड्यते ॥ तृतीयं
मासमावश्यंकालाज्ञायांभवेन्नरः ॥ ३५० ॥

अर्थ--ज्याचे दांत व वृषण पीडित केले असतां पीडित होत नाहींत तो मनुष्य तीन महिन्यांनंतर कालाचे स्वाधीन होतो.

कालोदूरस्थितोवापियेनापायेनलक्ष्यते ॥ तंवदामि
समासेनयथादिष्टंशिवागमे ॥ ३५१ ॥

अर्थ--मरणकाळ दूर किंवा समीप आहे हें ज्या उपायानें समजतें तो उपाय शिवागमांत सांगितल्याप्रमाणें संक्षेपानें सांगतों.

एकांतंविजनंगत्वाकृत्वाऽदित्यंचपृष्ठतः ॥ निरीक्षये-
न्निजच्छायांकंठदेशेसमाहितः ॥ ३५२ ॥

अर्थ--निर्जन अरण्यांत एकांतीं जाऊन पृष्ठभागीं सूर्य करून आपली छाया कंठप्रदेशाचे ठिकाणीं निश्चळ अवलोकन करावी.

ततश्चाकाशमीक्षेतऱ्हींपरब्रह्मणेनमः ॥ अष्टोत्तरश-
तंजप्त्वाततःपश्यतिशंकरं ॥ ३५३ ॥

अर्थ--नंतर आकाश अवलोकन करावें मग " ॐऱ्हीं परब्रह्मणेनमः " या मंत्राचा अष्टोत्तरशें जप करावा, म्हणजे शंकराचें दर्शन होतें.

शुद्धस्फटिकसंकाशंनानारूपधरंहरम् ॥ षण्मासा-

भ्यासयोगेनभूचराणांपतिर्भवेत् ॥ वर्षद्वयेनतेनाथ कर्त्ताहर्त्तास्वयंप्रभुः ॥ ३५४ ॥

अर्थ--जपांतीं शुद्ध स्फटिकाप्रमाणें स्वच्छ आणि नानारूपें धारण करणारा शंकर दृष्टिगोचर होतो. असा सहा महिने अभ्यास केला असतां तो सर्व भूचर प्राण्यांचा राजा होतो. दोन वर्षें अभ्यास केल्यानें स्वतः सृष्टि–कर्त्ता व संहर्त्ता होतो.

त्रिकालज्ञत्वमाप्नोतिपरमानंदमेवच ॥ सतताभ्यासयोगेननास्तिकिंचित्सुदुर्लभम् ॥ ३५५ ॥

अर्थ–असा सतत अभ्यास केला असतां त्रिकाल ज्ञान प्राप्त होतें व परम आनंदांत नेहमीं राहतो व त्यास कांहींच दुर्लभ रहात नाहीं.

तद्रूपंकृष्णवर्णयःपश्यतिव्योम्निनिर्मले ॥ षण्मासान्मृत्युमाप्नोतिसयोगीनात्रसंशयः ॥ ३५६ ॥

अर्थ–तें रूप, निर्मळ आकाशांत कृष्णवर्ण ज्यास दिसतें तो योगी सहा महिन्यांत मृत्यु पावतो हें निःसंशय होय.

पीतेव्याधिर्भयंरक्तेनीलेहानिंविनिर्दिशेत् ॥ नानावर्णेऽथचेत्तस्मिन्सिद्धश्चगीयतेमहान् ॥ ३५७ ॥

अर्थ–पिंवळें रूप दृष्टीस पडलें असतां व्याधि, तांबडें दिसल्यास भय, आणि निळें दिसल्यास हानि होईल असें जाणावें. अनेक रंगाचें चित्ररूप दिसलें तर सिद्धि प्राप्त होतें.

पदेगुल्फेचजठरेविनाशःक्रमशोभवेत् ॥ विनश्यतोयदाबाहूस्वयंतुम्रियतेध्रुवम् ॥ ३५८ ॥

अर्थ–दृष्टिगोचर झालेल्या छाया पुरुषाचे पाय, घोटे, आणि पोट यांचा क्रमानें आधीं नाश होऊन नंतर बाहूचा नाश झाला असतां योगी मरतो.

वामबाहुस्तथाभार्यानश्येतेतिनसंशयः ॥ दक्षिणे

बंधुनाशोहीमृत्युमाप्तंविनिर्दिशेत् ॥ ३५९ ॥

अर्थ—वामहस्ताचा नाश झाल्यास भार्या नाश पावते आणि दक्षिण हस्ताचा नाश झाला म्हणजे बंधुनाश होऊन आपल्यासही मृत्यु होतो असें जाणावें.

अशिरोमासमरणंविनाजंघेदिनाष्टकं ॥ अष्टाभिः
स्कंधनाशेनछायालोपेनतत्क्षणात् ॥ ३६० ॥

अर्थ—छाया शिरावांचून दिसल्यास महिन्यानें, जंघा (पोटऱ्या) शिवाय दिसल्यास किंवा खांद्याचा नाश झाल्यास आठ दिवसांनीं आणि एकदम सर्व छाया नाहींशी झाल्यास तत्क्षणीं मरण प्राप्त होतें.

प्रातःपृष्ठगतेरवौचनिमिषाच्छायांगुलीश्चाधरं॥दृष्ट्वा-
र्धेनमृतिस्त्वनंतरमहोच्छायानरंपश्यति ॥तत्कर्णांस-
करस्यपार्श्वहृदयाभावेक्षणार्धात्स्वयं ॥दिङ्मूढोहि
नरःशिरोविगमतोमासांस्तुषट्जीवति ॥ ३६१ ॥

अर्थ—प्रातःकालीं रवि पाठीस असतां छाया पुरुषाच्या अंगुली व अधरोष्ठ दिसतील तर एक निमिषांत मृत्यु होतो. आणि छाया पुरुषास व आपणास अगदीं अंतर नसल्यास अर्ध्या निमिषांत मरण प्राप्त होतें. छाया पुरुषाचे कान, खांदे, हात, मुख, कुशी व हृदय यांचा एकदम अभाव झाल्यास अर्ध्या क्षणांत मरण येतें. आणि छाया पुरुषाचें शिर नष्ट होऊन पुरुषास दिशा-भुली झाली तर तो सहा महिने जगतो.

एकादिषोडशाहानियदिभानुर्निरंतरम् ॥ वहेद्यस्य
चवैमृत्युःशेषाहेनचमासिके ॥ ३६२ ॥

अर्थ—एकापासून सोळा दिवसपर्यंत जर सारखा सूर्यस्वरच नेहमीं वाहील तर तसें झाल्यापासून महिन्याचे आंत तो मरण पावतो.

संपूर्णंवहतेसूर्यश्चंद्रमानैवदृश्यते ॥ पक्षेणजायते
मृत्युःकालज्ञानेनभाषितम् ॥ ३६३ ॥

अर्थ--जर महिनाभर सारखा सूर्यच वाहून चंद्रस्वर मुळींच उदय पावत नाहीं तर त्याचा पंधरा दिवसांनीं मृत्यु होतो असें कालज्ञानी सांगतात.

मूत्रंपुरीषंवायुश्चसमकालंप्रवर्त्तते ॥ तदाऽसौचलितोज्ञेयोदशाहेम्रियतेध्रुवम् ॥ ३६४ ॥

अर्थ--मूत्र, मळ आणि वायु हे एकाकाळीं चालूं लागले असतां प्राण चंचळ झाला असें समजावें. तो मनुष्य दहा दिवसांत मरतो.

संपूर्णवहतेचंद्रःसूर्योनैवचदृश्यते ॥ मासेनजायते मृत्युःकालज्ञेनानुभाषितम् ॥ ३६५ ॥

अर्थ--सर्वकाळ चंद्र वाहत असून सूर्यस्वर मुळींच वाहत नसल्यास त्या मनुष्याचा मृत्यु एक महिन्यानें होतो असें काल-ज्ञाते सांगतात.

अरुंधतींध्रुवंचैवविष्णोस्त्रीणिपदानिच ॥ आयुर्हीनानपश्यंतिचतुर्थंमातृमंडलम् ॥ ३६६ ॥

अर्थ--ज्याचें आयुष्य सरलें आहे ते लोक अरुंधती, ध्रुव, विष्णूचीं पदें आणि चौथें मातृमंडल यांस पहात नाहींत.

अरुंधतीभवेज्जिव्हाध्रुवोनासाग्रमेवच ॥ भ्रुवौविष्णुपदंज्ञेयंतारकंमातृमंडलम् ॥ ३६७ ॥

अर्थ--अरुंधती ह्मणजे जिव्हा, ध्रुव ह्मणजे नासिकाग्र, भिवया तें विष्णुपद आणि तारक (डोळ्यांतील बाहुली) तें मातृमंडल जाणावें; हे चारी पदार्थ मुमूर्षुस दिसत नाहींत.

नवभ्रुवंसप्तघोषंपंचतारांत्रिनासिकां ॥ जिव्हामेकदिनंप्रोक्तंम्रियतेमानवोध्रुवम् ॥ ३६८ ॥

अर्थ--भिंवयी दिसत नाहींशी झाल्यापासून नऊ दिवसांत मनुष्य मरतो, कानांतील शब्द ऐकूं येत नाहीं असें झाल्यावर सात दिवसांत; तारक दिसेनासे झाल्यावर पांच दिवसांत; नासिका न दिसल्यास तीन

दिवसांनीं आणि जिव्हा दिसेनाशी झाली असतां एके दिवसांत मरण येतें असें समजावें.

कोणावक्ष्णोरंगुलिभ्यांकिंचित्पीड्यनिरीक्षयेत् ॥ यदानदृश्यतेबिंदुर्दशाहेनभवेन्मृतः ॥ ३६९ ॥

अर्थ—डोळ्यांचे कोन दोन बोटांनीं दाबून पहावें जर त्या पहाण्यांत बिंदु दिसणार नाहीं तर तो मनुष्य दहा दिवसांनीं मरण पावेल.

तीर्थस्नानेनदानेनतपसासुकृतेनच ॥ जपैर्ध्यानेन योगेनजायतेकालवंचना ॥ ३७० ॥

अर्थ—तीर्थाचें स्नान, दान, जप, ध्यान आणि योग इत्यादि पुण्याचरणेंकरून कालाचें वंचन होतें.

शरीरंनाशयंत्येतेदोषाधातुमलास्तथा ॥ समस्तुवायुर्विज्ञेयोबलतेजोविवर्द्धनः ॥ ३७१ ॥

अर्थ—अनेक दुराचरणें व धातुगत मळ हे शरिराचा नाश करतात. वायु हा सारखा शरिरांत असतां बल व तेज यांचें वर्धन करतो.

रक्षणीयस्ततोदेहोयतोधर्मादिसाधनम् ॥ योगजाप्यत्वमायांतिसाधिजप्यास्तुसाध्यतां ॥ असाध्याजीवितंघ्नंतिनतत्रास्तिप्रतिक्रिया ॥ ३७२ ॥

अर्थ—देह हा धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांचें साधन आहे ह्मणून याचें संरक्षण करावें. पूर्वश्लोकांतील दोष योगाभ्यासानें जातात याकरितां योग करावा ह्मणजे ते साध्य होतात. वरील दोष असाध्य असल्यास ते प्राणाचा नाश करतात. त्यास कांहीं परिहार नाहीं.

येषांहृदिस्फुरतिशाश्वतमद्वितीयंतेजस्तमोनिवहनाशकरंरहस्यं ॥ तेषामखंडशशिरम्यसुकांतिभाजां स्वप्नेऽपिनोभवतिकालभयंनराणाम् ॥ ३७३ ॥

अर्थ—ज्यांच्या हृदयांत अज्ञान समुदायाचा नाश करणारें अनादि, अप्रतिम आणि अत्यंत गोप्य असें हें शिवस्वरोदयज्ञान जागरूक आ-

हे यांच्या शरिराची कांति पूर्णचंद्रासारखी आल्हादक होऊन स्वप्ना- देखील त्यांस कालापासून भय होत नाहीं.

इडागंगेतिविज्ञेयापिंगलायमुनानदी ॥ मध्येसर- स्वतींविद्यात्प्रयागादिसमस्तथा ॥ ३७४ ॥

अर्थ--इडा (वामनाडी) ही गंगा होय, पिंगला (दक्षिणनाडी) ही यमुना होय, आणि मध्यें जी सुषुम्ना ती सरस्वती जाणावी. हा नाडित्रय–संगम केवळ प्रयागतुल्य होय.

आदौसाधनमाख्यातंसद्यःप्रत्ययकारकं ॥ बद्धप- द्मासनोयोगीबंधयेदुड्डियानकं ॥ ३७५ ॥

अर्थ–आधीं तात्काळ विश्वास उत्पन्न करणारें साधन सांगितलें आहे तें असें, योगी मनुष्यानें पद्मासन घालून उड्डियान नामक* बंध साधावा.

पूरकःकुंभकश्चैवरेचकश्चतृतीयकः ॥ ज्ञातव्योयोगि- भिर्नित्यंदेहसंशुद्धिहेतवे ॥ ३७६ ॥

अर्थ–नंतर देहाची शुद्धता होण्याकरितां योगीजनांनीं पूरक, कुंभक आणि रेचक असा तीन प्रकारचा प्राणायाम करावा.

पूरकःकुरुतेवृष्टिंधातुसाम्यंतथैवच ॥ कुंभकेस्तंभनं कुर्याज्जीवरक्षाविवर्द्धनं ॥ ३७७ ॥

अर्थ–पूरक (बाहेरचा वायु आंत ओढणें) देहांत आर्द्रता आणि धातूंचें समत्व करतो. कुंभक (बाहेर व आंत वायु चंचळ न होऊं देतां स्थिर करणें) जीवाचें रक्षण चिरकाळ करतो.

रेचकोहरतेपापंकुर्याद्योगपदंव्रजेत् ॥ पश्चात्संग्राम- वत्तिष्ठेल्लयबंधंचकारयेत् ॥ ३७८ ॥

अर्थ–रेचक (आंतून बाहेर वायु सोडणें) पापाचा नाश करतो.

---

* अपानास ऊर्ध्वगति देऊन नाभिरंध्रापाशीं आणणें यास योग शास्त्रांत उड्डियान बंध म्हणतात.

याप्रमाणें त्रिविध प्राणायाम केल्यानें योगाचें स्थैर्य होतें. नंतर संग्रामांत उभें राहिल्याप्रमाणें तत्पर असून लयबंध करावा.

कुंभयेत्सहजंवायुंयथाशक्तिप्रकल्पयेत् ॥ रेचयेच्चंद्रमार्गेणसूर्येणापूरयेत्सुधीः ॥ ३७९ ॥

अर्थ—वायूचें स्तंभन (कुंभक) सहज रीतीनें होईल तितकें यथाशक्ति करावें. रेचक चंद्रनाडीनें करावा आणि पूरक हा सूर्यनाडीचे द्वारानें करावा.

चंद्रंपिबतिसूर्यश्चसूर्यंपिबतिचंद्रमाः ॥ अन्योन्यकालभावेनजीवेदाचंद्रतारकम् ॥ ३८० ॥

अर्थ—चंद्रस्वरास सूर्यस्वर प्राशन करतो आणि सूर्यस्वरास चंद्रस्वर प्राशन करतो, या रीतीनें एकमेकांत त्यांचा लय केल्यानें चंद्र तारका आहेत तोंपर्यंत योगी जीवंत राहतो.

स्वीयांगेवहतेनाडीतन्नाडीरोधनंकुरु ॥ मुखबंधममुंचन्वैपवनंजायतेयुवा ॥ ३८१ ॥

अर्थ—आपल्या ज्या अंगास नाडी वाहते त्या अंगास त्या नाडीचें रोधन करावें, आणि मुखबंध करून मुखातून वायु सोडूं नये. असें केल्यानें योगी तारुण्य पावतो.

मुखनासाक्षिकर्णांतानंगुलीभिर्निरोधयेत् ॥ तत्त्वोदयमितिज्ञेयंषण्मुखीकरणंप्रियम् ॥ ३८२ ॥

अर्थ—मुख, नासिकारंध्रें, नेत्र व कान हीं स्थानें हातांच्या अंगुलींनीं रोधून मग तत्त्वांचे उदय जाणावे या मुद्रेस षण्मुखीकरण असें ह्मणतात.

तस्यरूपंगतिःस्वादोमंडलंलक्षणंत्विदम् ॥ सवेत्तिमानवोलोकेसंसर्गादपिमार्गवित् ॥ ३८३ ॥

अर्थ—षण्मुखी मुद्रेचा मार्ग जाणता योगी तिच्या योगानें तत्त्वांचें रूप, गति, स्वाद, (रुचि) व मंडल हीं लक्षणें जाणतो.

निराशोनिष्कलोयोगीनकिंचिदपिचिंतयेत् ॥ वास-

नामुन्मनांकृत्वाकालंजयतिलीलया ॥ ३८४ ॥

अर्थ—पूर्वोक्त मुद्रा करून निस्पृह व शुची होऊन योग्यानें कांहीं एक चिंतन करूं नये. मनांतून सर्व वासना नाहींशा कराव्या, म्हणजे तो योगी काळास जिंकतो.

विश्वस्यवेदिकाशक्तिर्नेत्राभ्यांपरिदृश्यते ॥ तत्रस्थं तुमनोयस्ययाममात्रंभवेदिह ॥ ३८५ ॥ तस्यायु-र्वर्धतेनित्यंघटिकात्रयमानतः ॥ शिवेनोक्तंपुरातंत्रे सिद्धस्यगुणगव्हरे ॥ ३८६ ॥

अर्थ—सर्व जगास जाणणारी शक्ति नेत्रांतून प्रकट होते. त्या श-क्तीचे ठिकाणीं ज्याचें मन प्रहरभर स्थिर राहतें, ३८५ त्याचें आयु-ष्य दररोज तीन घटिकाप्रमाणें वाढतें, असें शंकरांनीं तंत्रांत सिद्धांचे गुण सांगतांना कथन केलें आहे.

बद्धंपद्मासनस्थागुदगतपवनंसन्निरुध्यामुमुच्चैःतंत-स्यापानरंध्रेक्रमजितमनिलंप्राणशक्त्यानिरुध्य ॥ एकीभूतंसुषुम्नाविवरमुपगतंब्रह्मरंध्रेचनीत्वानिक्षि-प्याकाशमार्गेशिवचरणरतायांतितेकेऽपिधन्याः८७

अर्थ—योगी पुरुषांनीं पद्मासन घालून गुदस्थानीं रोध करावा, आ-णि तेथील अपान नामक वायूस प्राणशक्तीच्या योगानें रोधून एक रू-प करावें. नंतर सुषुम्नाविवरानें त्या वायूस ब्रह्मरंध्राचेठिकाणीं न्यावें, आणि मग आकाश मार्गांत ठेवून शिवचरणाचेठायीं रममाण व्हावें जे योगी अशा स्थितींत असून प्राणोत्क्रमण करितात ते धन्य होत.

एतज्जानातियोयोगीएतत्पठतिनित्यशः ॥ सर्वदुः-खविनिर्मुक्तोलभतेवांछितंफलम् ॥ ३८८ ॥

अर्थ—हें स्वरोदयशास्त्र जो जाणतो आणि जो नित्य पठन करितो, तो सर्व दुःखांपासून मुक्त होऊन इच्छित फळ पावतो.

स्वरज्ञानंनरेयत्रलक्ष्मीःपदतलेभवेत् ॥ सर्वत्रच

शरीरेऽपिसुखंतस्यसदाभवेत् ॥ ३८९ ॥

अर्थ--स्वरज्ञान ज्यास आहे त्याचे चरणापाशीं लक्ष्मी वास करते, व त्याचे शरीरास सर्व काळ सर्व ठिकाणीं सुख होतें.

प्रणवःसर्ववेदानांब्रह्मणोभास्करोयथा ॥ मृत्युलोकेतथापूज्यःस्वरज्ञानीपुमानपि ॥ ३९० ॥

अर्थ--सर्व वेदांत जसा ॐकार पूज्य, किंवा जसा सूर्य ब्राह्मणांस पूज्य, तसा स्वरज्ञानी पुरुष या मृत्युलोकांत पूज्य होय.

नाडित्रयंविजानातितत्त्वज्ञानंतथैवच ॥ नैवतेनभवेत्तुल्यंलक्षकोटिरसायनं ॥ ३९१ ॥

अर्थ--ज्यास तिन्ही नाडींचे आणि तत्त्वांचें ज्ञान आहे त्या मनुष्याचे तुलनेस कोटि रसायनेंही येणार नाहींत.

एकाक्षरप्रदातारंनाडीभेदविवेचकम् ॥ पृथिव्यांनास्तितद्द्रव्यंयद्दत्वाचानृणीभवेत् ॥ ३९२ ॥

अर्थ--एक अक्षर (अद्वितीय अनंत ब्रह्म) ज्यानें उपदेशिलें आणि नाडींचा भेद ज्यानें विवेचन करून सांगितला, त्यास जें द्रव्य दिल्यानें शिष्य ऋणमुक्त होईल तें द्रव्य पृथ्वी वरही नाहीं.

स्वरस्तत्त्वंतथायुद्धंदेविवश्यंस्त्रियस्तथा ॥ गर्भाधानंचरोगश्चकलार्द्धेनैवमुच्यते ॥ ३९३ ॥

अर्थ—हे देवि, या शास्त्रांत स्वर,तत्त्वें, युद्ध, स्त्रियांचें वशीकरण, गर्भाधान आणि रोग याविषयींचा निर्णय एक्या अर्द्ध कलेंत केला जातो.

एवंप्रवर्तितंलोकेप्रसिद्धंसिद्धयोगिभिः ॥ चंद्रार्कग्रहणेजाप्यंपठतांसिद्धिदायकं ॥ ३९४ ॥

अर्थ—या प्रकारचे हें शास्त्र या लोकांत सिद्ध योग्यांनीं प्रकाशित केलें; हें चंद्र सूर्य ग्रहणांत जप किंवा पठन केलें असतां सिद्धि प्राप्त होते.

स्वस्थानेतुसमासीनोनिद्रांचाहारमल्पकम् ॥ चिं-
तयेत्परमात्मानंयोवेदसभविष्यति ॥ ३९५ ॥

॥ इति श्रीउमामहेश्वरसंवादे स्वरोदयशास्त्रं संपूर्ण ॥

अर्थ—स्वस्थानीं स्थिर बसून निद्रा व आहार परिमित सेवन करावा आणि त्वदयांत स्वरूपी परमात्म्याचें चिंतन करावें ह्मणजे त्यास स्वरज्ञान होऊन त्याचा उत्कर्ष होईल. ॥ इति सार्थ स्वरोदयः

समाप्त.